साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

# व्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

... in arrears ... „ 1 ...
Six monthly......... 3 ............ ...
Single copy ............................ ...
Advertisement
Below 10 lines ...... 2 ...
Per line over 10 ...... ...
Repetition Peline······3 ...

VOL XXXI | AKOLA MONDAY 4 OCTOBER 1897 | NO 39
वर्ष ३१ | आकोला सोमवार तारिख ४ माहे आक्टोबर सन १८९७ इ० | अंक ३९

जाहिरात

नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबें वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हरएक प्रकारचा माल घेऊन व्ही. पीनें पाठवूं. कमिशन रुपयास ६ पै.

**पत्ता**— आबाजी सिताराम मोडक
नासिक

---

अकोला ता० १७।९।९७

महर्गता आणि महामारी

॥ पद ॥

( पाहतां पाहतां धर्म बुडाला या चालीवर )

॥ सन अठराशें शहाण्व तसे सत्याण्वची पहा मजा ॥
॥ महामारि आणि महर्गता ही जनांस प्रभुनें दिली सजा ॥ धृ ॥
॥ दुर्दैवी या आर्यभुमिवर दुर्मुख संवत्सर आला ॥
॥ नृप होउनिया प्रभु सत्तेनें दुःसह तो लोकां झाला ॥
॥ महर्गतेनें वरिले त्याला कारभार घेतला करीं ॥
॥ वरी पतीला अकळुनि तेजें अंकुश जैसा मत्त करी ॥
॥ अबला प्रबला होती तेथें काय पुसावा अविचार ॥
॥ हां हां ह्मणतां तिनें पसरली सत्ता सर्वहि देशभर ॥
॥ जलद वर्षुनि सिंकहि सारीं होती तीं हिरवी गार ॥
॥ सुख सागर तो लोकांपासुनि नव्हता कीं बहुसा दूर ॥
॥ हिनें सोडुनि हुकूम पहिला परजन्याला दिली रजा ॥ १ ॥ सन अठराशें०॥
॥ जन बावरले दीन जाहले हाय हाय करिती सारे ॥
॥ दिवसा भानू दुःसह तापे रजनीला दिसती तारे ॥
॥ कोणी करिती नाम-सप्तहा देवावर सतत धार ॥
॥ वेदघोष जाग्रणें करुनिया ब्राह्मण झाले बेजार ॥
॥ कोणी उदकानें कोंडुनिया खोलेश्वर दमले दमले भारी ॥
॥ राजेश्वर जागेश्वर तैसा कनकेश्वरही परोपरी ॥
॥ परी दीन-वत्सलता गेली साऱ्यांचीही विलयाला ॥
॥ महर्गता ही प्रसन्न झाली माय विसरली तनयाला ॥
॥ भरलीं शंभर वर्षें पुरली गरिबांची हो मात्र कजा ॥ सन अठराशें० ॥ २ ॥
॥ कहर उडविला व्यवहाऱ्यांनीं जहर गिळावें वाटतसे ॥
॥ पळ घटकेला भाव चढतसे धैर्यपटलही फाटतसे ॥
॥ कृपावंत भगवंत सुदेवें व्हिक्टोरिया राज्य करी ॥
॥ जिची नये या धरामंडली कोणाही भूपास सरी ॥
॥ जननी सम कळवुनि पेटीं अनाथालयें स्थापियलीं ॥
॥ अंध, पांगळे, वृद्ध, बाल, या सर्वांनाही सदां खुलीं ॥
॥ रिलीफ कामें काढुनि केलें इतरांचे पोषण नेटें ॥
॥ भत्ते दिधले मात्र ऐकतों नौकर लोकांना कोठें ॥
॥ न जुमानुनिया महर्गतेनें फडकविली आपुलीच ध्वजा ॥ सन अठराशें० ॥ ३ ॥
॥ खुदावंत सरकार दयाळू इंग्लिश राजे बहादुर ॥
॥ त्यांच्या शौर्यें सत्ता न चले महर्गतेची बरोबर ॥
॥मोटे मोठे पगारवाले धन-पतिही सत्ताधीश॥
॥ त्यांचेपाशीं या बाईचा तोरा न चले कीं लेश ॥
॥ यास्तव पटकी गोळी वारा होत अशीं विविधा नामें ।
॥ जिची सदोदित चालूं शकती बिनहरकत सारीं कामें ॥
॥ तिला देउनी महामारी हा किताब सेनाधिश केलें ॥
॥ सुरा प्राशुनी मत्त माकडा हातीं कोलित कीं आलें ॥
॥ सर्व ठिकाणीं तिनें तत्क्षणीं पाठविल्या आपुल्या फौजा ॥ ४ ॥ सन अठराशें ॥
॥ खुला मृत्युच्या दरबाराचा दरवाजा मोठा झाला ॥
॥ न्याय कराया नसेल फुरसत वाटतसे मज यमाजिला ॥
॥ प्रळय उडाला लोक बुडाला दुःख सागरीं चहूंकडे ॥
॥ सर्वांवर सारखी अकस्मिक अकाबाईची धाड पडे ॥
॥ जिकडे तिकडे नगरामध्यें कर्णीं रोदनध्वनी पडे ॥
॥ कामकाज तें न सुचे कांहीं चित्ताची स्थीरता उडे ॥
॥ भेद न उरला ज्याचा भरला शेर तया जाणेंच पडे ॥
॥ परी वैद्य डाक्टर लोकांचें झालें भारी कीं परडें ॥
॥ सांप्रत दुसरा नसे आसरा ईश चरण पंकजा भजा ॥ ५ ॥ सन अठराशें ॥
॥ पुणें मुंबईस प्लेग पसरला कलकत्तीं धरणी कंप ॥
॥ कथा ऐकुनीं फक्त तयांच्या सुटतो हृदयाकंप ॥
॥ अनावृष्टि कुणीकडे होतसे अति वृष्टी कोणे देशीं ॥
॥ अनिष्ट ग्रह या दो वर्षीं मधिं आले भारत वर्षासी ॥
॥ बाबा भीक न मागूं देई आई जेऊं न घालितसे ॥
॥ गेली घटका सोन्याची ती पुढलीचा भरंवसा नसे ॥
॥ दुर्गेच्या दुष्काळा झालीं वर्षें निश्चय पांच शतें ॥
॥ इतिहासाला ऐकुनि त्याची आज जणुं आठवण होते ॥
॥ परि राज्य रीती या योगें परिणाम न तैसा झाला ॥
॥ ईश चिरायू करो आमुच्या भाग्य शालिनी राज्ञीला ॥
॥ अल्प मतीनें ल.सो.प कविनें केली कविता छंद वजा ॥ ६ ॥ सन अठराशें ॥

---

व्हाडसमाचार

---

मिती आश्विन शुद्ध ९ शके १८१९

---

मि. सुब्रमणी अय्यर यांचें मत आहे कीं या देशाची स्थिति सुधारण्या करितां जो काय प्रयत्न करणें तो याच देशांत झाला पाहिजे, इंग्लंदांत प्रयत्न केला असतां त्यांत कांहीं यश येणार नाहीं. मि० वाचा यांचें मत अगदीं या उलट आहे. ते ह्मणाले कीं मि० अय्यर यांनीं सांगितल्या प्रमाणें ह्या देशांत आपल्यास प्रयत्न करणें जितकें अवश्य आहे तितकेंच इंग्लंदांतही यत्न करणें अवश्य आहे. आपल्या प्रयत्नांस यश यावें अशी जर आपली इच्छा असेल तर इंग्लंदांतच चवळ केली पाहिजे हें आपलें ठाममत आहे असें त्यांनीं सांगितलें. या आपल्या ह्मणण्याच्या पुष्टी करणार्थ त्यांनीं वेलबी कमिशनचें उदाहरण दिलें. ते ह्मणाले कीं जर आपण आणि आपल्या ब्रिटिश मित्रांनीं पार्लमेन्टांत या संबंधीं खटपट केली नसती तर हें हल्लींचें कमिशन कधीं तरी स्थापित झालें असतें काय? हिंदुस्थान ब्रिटिश अंमलाखालीं आल्यापासून असें राजकीय कमिशन पूर्वीं कधींच आपल्यास मिळालें नाहीं आणि ह्याचें बहुतेक सर्व श्रेय ब्रिटिश कांग्रेस पार्टीसच आपण दिलें पाहिजे. आतां ह्या कमिशन पासून आपला फायदा कितीका अल्प असेना, पण असें कमिशन नेमलें गेलें हीं कांहीं कमी महत्वाची गोष्ट नाहीं. ब्रिटिश लोकांची न्यायप्रीति आणि निष्पक्षपात ह्यांवर आपण भरंवसा ठेवून यत्न करावा ह्मणजे त्यांत लवकर अथवा उशिरां यश आल्या शिवाय कधीं राहणार नाहीं.

---

जुनाट ताम्रपट, इमारती, नाणीं इत्यादिकांवरून मनुष्याच्या प्राचीन इतिहासाचा शोध लावण्याचा मोठा प्रयत्न ब्रिटिश सरकारानें पुष्कळ चालविला आहे. आमच्या देशांत इतिहास लिहून ठेवण्याची चाल जशी पाहिजे तशी नव्हती. इंडियाच्या प्राचीन इतिहासशालेंत प्रवेश केल्याबरोबर कालनिर्णयाची मोठी अडचण पडते. एखाद्या कवीचा, ग्रंथकाराचा किंवा राजवंशाचा काल निर्णित करावयाचा असला ह्मणजे अनुमानानें कालबोध करण्यासाठीं अनेक युक्त्या लढवाव्या लागतात. ताम्रपट इमारती, व नाणीं हीं जशीं कालनिर्णयाला साधनें आहेत त्याचप्रमाणें जुन्या कवींच्या सांप्रदाया प्रमाणें एकाचा दुसऱ्या कोणी केलेला उल्लेख, राजादिकांस ग्रंथसमर्पण इत्यादि साधनांचा आश्रय करावा लागतो. जुन्या इतिहासाची माहिती अशा प्रकारच्या उपायांनीं उपलब्ध करण्याविषयीं आमच्या सरकारचें यत्न पुष्कळ वर्षांपासून चालू आहेत आणि सरकारी आश्रयाखालीं थोर थोर शोधकांचे शोध ग्रंथद्वारा प्रकाशित होत असतात.

हल्लीं मद्रास-सरकारानें चालुक्य राजवंशाचा कालनिर्णय त्या वेळच्या शिल्पशास्त्राच्या निरीक्षणावरून पक्का केला आहे. मि० अलेकझांडर यांनीं चालुक्यांच्या वेळच्या शिल्पशास्त्रासंबंधानें साधार सचित्र ग्रंथ प्रसिद्ध केला आहे पण त्यामध्यें असावी तितकी भरपूर माहिती नाहीं. चालुक्य नांवच्या प्रसिद्ध राजवंशानें इसवी सनाच्या ६ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत राज्य केलें अशी त्या वेळचीं कित्येक जुनीं देवालयें जुन्या कालस्थितीची साक्ष देतात. ११८९ च्या सुमारापर्यंत चालुक्यवंशीय राजे लोकांनीं राज्य केलें परंतु या शतकापुढें त्यांच्या अस्तित्वा विषयीं निराळा बोधच होत नाहीं, चालुक्य वंशानें ह्मैसूर किंवा ह्मैसूरच्या उत्तर भागीं राज्य केलें असें देवालयादिकांची रचना सांगते. ह्मैसूरच्या उत्तरभागीं पण तुंगभद्रेच्या दक्षिणेला निजाम सरकारच्या राज्याच्या दक्षिण भागांत चालुक्यांचें वास्तव्य असावें. ४२ देवळांचीं चित्रें निरनिराळ्या स्थाना पासून दिसणाऱ्या भिन्नभिन्न भागांच्या दर्शनासह छापिली आहेत. परंतु मि० रे यांच्या उलट अभिप्रायाचे मि. फरर्ग्युसन यांनीं वृक्षपूजन व नागपूजन या संबंधानें निबंध लिहिला आहे त्यांत ते स्पष्ट ह्मणतात कीं खिस्ती शका पूर्वीच्या ३ शत

का पासून १२ व्या शतकापर्यंत तीन पासून ७ फणा पर्यंतचे सर्प चित्रांत काढलेले आढळतात परंतु मनुष्याची आकृती खालीं सर्पा सारखी असलेली आढळत नाहीं पण मि रे यांच्या ग्रंथांत नागेंद्र व नागकन्या यांची चित्रें उर्ध्व भाग मनुष्या कृतीचा व अधोभाग सर्पाकृतीचा दर्शवितात ह्यावरून मि० फरग्युसन यांच्या ह्मणण्या प्रमाणें चालुक्य वंशाचा काल ११ व्या शतका नंतरचा असावा आणि मि० रे साहेब तो काल बराच मागें घेतात तेव्हां खरा काल कोणता हें कांहीं पक्कें कळत नाहीं परंतु इतर अवान्तर कारणावरून मि० रे यांचें मत विशेष ग्राह्य दिसतें. डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. यांनीं या विषयांत पुष्कळ खोल रितीनें शोध केला आहे पण त्यांचा व्यासंग पुस्तकरूपानें लोकदृष्टी पुढें येण्याला मोठा काल लागतो आणि कधीं कधीं पुष्कळ विद्या त्यांच्या बरोबरच राहतात व लोकांस त्यांचा योग्य फायदा होत नाहीं.

——•——

√ नामदार बाळ गंगाधर टिळक यांस राजद्रोहा बद्दल शिक्षा झाली ही गोष्ट अत्यंत शोकपर्यवसायी होय. राजकीय अवकृपेला शरण गेलेंच पाहिजे. या शिक्षेनें राजद्रोह शाबीत न होता सरकारी अधिकाऱ्यांची राक्षसी शक्ती निर्णीत होते. सरकारी अधिकारी ह्मणजे सरकारचे मंत्री आहेत. त्यांच्या नेत्रांची दृष्टी तिर्यक झाली आणि दुःख प्रदर्शक मंत्र जपण्यांत आले ह्मणजे सरकारची वक्रता क्रांती उत्पन्न करिते आणि राजनिष्ठ सत्पुरुष देखील राजद्रोही ठरतात. नामदार टिळक राष्ट्रीय संतमालेंत प्रमुख अग्रस्थानीं आहेत. सज्जनांचा छळ तत्कालीन लोक करित असतात असें इतिहास सांगतो; आणि या इतिहासांतील गोष्टीला अनुसरूनच नामदार टिळक यांस शिक्षा झाली. परंतु अशा उदारचरित, सहिष्णु व सत्यशील पुरुषांच्या छळानें त्यांचीं नैतिक, राजकीय व सामाजिक मतें पूर्णपणें स्थापितें होऊन राष्ट्रीय उन्नतीच होईल.

नामदार टिळकांच्या शिक्षेनें राष्ट्रीय [illegible]रात्मा तळतळला हें सर्वतोमुखीं निघाले[illegible] उद्गारावरून निदर्शनास येतें. बाह्यात्का[illegible] दुःखप्रदर्शनाची साक्ष अंतरात्म्याला नको [illegible]ती पण शोकदर्शक गोष्टींचा परिणाम [illegible]य मनावर बिंबतो आणि सहानुभूती [illegible] जागृत राहते. या शिवाय सरकार[illegible]कृती विषयीं आह्मास बरेवाईटपणा कळवा[illegible]चा आहे आणि तो आमच्या छापील [illegible]पेक्षां शोकप्रदर्शक काळ्या चिन्हांनीं [illegible] मनापुढें मूर्तीमंत उभा राहील. बंगा[illegible] पत्रकारांनीं सरकारास आपली काळी [illegible] दाखविली आणि नामदार टिळकां[illegible] शिक्षे विषयीं आपले राजनिष्ठापूर्वक [illegible]गार व्यक्त केले. इंडियन मिरर, अमृत पत्रिका, बेंगाली इत्यादि पत्रांची शो[illegible] स्वरूपें पाहून सरकारास कांहीं [illegible] होईल असा आशातंतु मनाला [illegible]बंधनद्वारा आळ वाळतो. बंगाल्यांत[illegible] महाराष्ट्रांत ही वर्तमानपत्रकार [illegible]त्रें काळ्या कुळकुळीत रेषांनीं विद्रुप [illegible]सिद्ध करणार आहेत. आक्टोबरचा पहिला अंक असा शोकचिन्हांनीं परिपूर्ण असावा असा संकेत ठरल्या विषयीं आह्मास जरा उशिरा बातमी लागली. पहिल्या व चवथ्या पृष्ठांचा नमुना पडल्यावर कांहीं कागद छापून गेले आणि त्या नंतर हा बेत कळला ह्मणून आह्मी लागलीच शिल्लक प्रतीबद्दल व्यवस्था केली आणि दुसऱ्या व तिसऱ्या पृष्ठाबद्दल सर्व प्रतींचें एकच रूप ठेविलें आहे.

या शोकप्रदर्शनानें सरकारास प्रजेची असंतुष्टी विदित झाली आणि प्रिव्ही कौंसिलामध्यें पिनलकोडांतील Disaffection (अप्रेमा) चा कायमचा निर्णय होण्या पूर्वीं सरकार कृपाळू होऊन नामदार बाळ गंगाधर यांची अवशिष्ट शिक्षा रद्द करितील तर इंडियन प्रजेवर मोठे उपकार होतील. सरकारच्या विद्यानाचा संस्कार व उदार राजनितीचा परिणाम राजद्रोहाला इंडियांत शिरूं देखील देणार नाहीं. नाना विकल्प मनांत न आणतां सरकारानें भूतदयेची बाजूं स्वीकृत करावी यांत खरा पुरुषार्थ व मुत्सदीपणा आहे. उपकारानें मनुष्य जोडतो आणि क्षमाशील राजनीतीनें राजनिष्ठा अक्षय्य व अभंग होऊन वर्धमान होत जाते.

——•~~•——

√ नामदार बाळ गंगाधर टिळक यांच्यावर खटला चालूं असतांना एक बातमी कर्णोपकर्णीं ऐकिली होती कीं नामदार टिळक मुंबई सरकारच्या शद्बांत लिहिलेलें माफीपत्र सादर करितील तर त्यांच्या वरील खटला तहकूब करण्यांत येईल. या बाबतींत पुष्कळ खरेपणा होता असें आतां कळतें. नामदार टिळकांनीं माफीपत्राच्या समर्पणा विषयीं आपल्या एका स्नेह्यास एक नामी पत्र लिहिलें होतें त्या पत्रावरून त्या थोर पुरुषांची अप्रतिम राजनिष्ठा, धीरोदात्त विचार, राष्ट्रीय कळकळ, स्वकीय निष्कामता इत्यादि प्रशंसनीय गुण चांगले स्पष्टतेनें कळून येतात. मूळ पत्र इंग्रजींत आहे. त्याचें भाषांतर येणेंप्रमाणें आहे:—

"विरुद्ध पक्षाचें ह्मणणें अशा अर्थाचें पडतें कीं त्याचा मथितार्थ ह्मणजे मी अपराध कबूल करावा. तसें करण्यास मी सिद्ध नाहीं. लोकांमध्यें मला जो कांहीं मान आहे तो माझ्या वर्तनावर सर्वस्वी अवलंबून आहे. आणि या खटल्यामध्यें जर शत्रूपुढें मी भयभीत झालो— पण माझ्या अंतःकरणांतील पक्की गोष्ट ही कीं जुरी पुढें असा कच्चा खटला कधींच पूर्वीं आला नसेल— तर मला वाटतें कीं महाराष्ट्रांत राहणें हें अंदमानांत राहिल्या प्रमाणेंच आहे. या खटल्याच्या खऱ्या स्वरूपावरून मला पक्की उमेद आहे कीं मी विजयी होईन; पण या पत्रांतच व माझ्या या अशा प्रकृतींत मला सर्व कारणें लिहिवत नाहींत. मराठी भाषे विषयीं अनभिज्ञ असलेल्या जुरी विषयीं मला भिती वाटते; नाहीं तर, न्यायदानाबद्दल मला शंका नाहीं. माझ्या प्रमाणें आपणांला ही माहित आहे कीं ब्रिटिश राज्याविरुद्ध दुष्ट विचार आपल्या मनांत येऊं देण्याचा आपल्या ठायीं असंभवच आहे; आणि या अर्थीं आपल्या पैकीं कोणासही राजद्रोहाबद्दल शिक्षा व्हावी हें अशक्य होय. जर आपण राजकीय राडांत खेळतों तर आपण संकटाशीं लढलें पाहिजे. आमच्या (वर्तमानपत्राच्या) धंद्याच्या अशा जोखिमी आहेतच आणि त्यांच्याशीं सामना देण्यास मी तयार आहे. जर तुह्मी ह्मणतच असाल तर मी इतक्याच गोष्टीला सिद्ध आहे कीं: "मला वाटत नाहीं कीं ते लेख अराजनिष्ठेचे आहेत परंतु सरकारचे सल्लागारांस उलट प्रकारचे वाटतात. त्या बद्दल मला दुःख वाटतें." परंतु अशा कबूलीनें सरकारची संतुष्टी होत नाहीं. त्यांच्या मनांतून पुण्याच्या पुढाऱ्याची छी थु करावयाची आहे; आणि मला वाटतें कीं प्रोफेसर गोखले व 'ज्ञानप्रकाशाचे' एडिटर यांच्या प्रमाणेंच मी कसपट कचरा आहे असें त्यांस वाटणार नाहीं, या शिवाय तुह्मी हें लक्ष्यांत धरावें कीं कांहीं इयत्ते पलिकडे आपण सर्वजण लोकांचे चाकर आहों. अशा आणिबाणीच्या वेळीं जर आपण नामर्दपणानें कचर खाल्लीं तर आपण लोकांस तोंडवशी पाडूं व त्यांस नाउमेद करूं. परंतु सगळ्यांत मुख्य गोष्ट अशी कीं प्रामाणिक व मानधन माणूस मी आहे तेव्हां अराजनिष्ठेचा लवलेश नसतांही अराजनिष्ठेच्या अपराधाची कबूली मी कशी देईन! जर मला शिक्षा झाली तर माझ्या देशबांधवाची सहानुभूती मला राजदंड भोगण्यास समर्थ करील."

नामदार टिळकांनीं दर्शविलेली कांक्षा दुष्ट रितीनें प्रत्यंतरास आली खरी; परंतु या गृहस्थांचें हें पत्र वाचून कोणत्या ब्रिटन मनुष्याचें अंतःकरण हालणार देखील नाहीं बरें!

——•~•——

√ राष्ट्रीय सभे साठीं वर्गणी जमा करण्याचें काम झपाट्यानें चालूं आहे. प्रांताच्या मानानें वऱ्हाडांत मंडळीचा जमाव लहान आहे. तथापि आनंदाची गोष्ट कीं आमच्या प्रांतस्थ मंडळींत राष्ट्रीय सभेच्या कार्यासंबंधानें फाटाफूट, दूही, किंवा बेबनाव तिळमात्र नाहीं. या मंगल कार्याला सर्व सुखवस्तु सार्वजनिक कार्याचे पुढारी गृहस्थ एकत्र होऊन मनोभावानें मदत करीत आहेत. पश्चिम वऱ्हाडांत आकोला मुख्य स्थानीं आहे आणि या भागांतील चळवळ आकोल्याच्या प्रमुख मंडळीच्या आश्रया खालीं चालत असते. पूर्व वऱ्हाडांत उमरावती मुख्य स्थानीं आहे आणि तेथील सार्वजनिक कार्यांत सरसावलेली मंडळी येत्या सभेच्या कार्यमालेला अगदीं तत्परतेनें लागली आहे. आकोल्यास राव साहेब देवराव विनायक हे सर्वजणांत मुख्य राजे आहेत आणि त्यांच्या गोड, मृदु, व कळवळ्याच्या हुकूमा खालीं पश्चिम वऱ्हाडांतील मंडळी मोठ्या आनंदानें कामें करीत आहेत. उमरावतीस राष्ट्रीय सभेच्या स्वागत-मंडळीचे अध्यक्ष रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे आहत आणि त्यांच्या संधानानें बहुतेक सर्व मंत्रीमंडळ वागत असतें. सांप्रतच्या व्यवस्थेवरून यंदाची राष्ट्रीय सभा मागील सभा प्रमाणेंच टोलेजंग होऊन पूर्वीची विजयश्री कायम राहील अशी आह्मांस उमेद आहे.

राष्ट्रीय सभेसाठीं वर्गणी जमविण्याचा क्रम गांववारीनें चालविला आहे. गांवोगांव प्रमुख मंडळी फिरतात, राष्ट्रीय सभेचे हेतु, उद्योग व मनोरथ लोकांस कळवितात आणि या प्रांतावर यंदाच्या बैठकी संबंधानें जो मोठा बोजा आहे तो यथाशक्ति हलका करण्या साठीं लोकांस विनंती करितात. राष्ट्रीय सभा हें नांव या वर्षी प्रत्येकाच्या कर्णांत गुणगुणत असतें आणि दुष्काळाचें वर्ष नुकतेंच पुरें होत आहे तथापि वर्गणी विषयीं कोणी कांकूं करीत नाहींत ही आनंदाची गोष्ट होय. वर्गणी जशी मोठमोठ्या रकमेनें जमावी तशी जमत नाहीं. पण त्याला इलाज नाहीं. लोकांपाशीं द्राव्य राहिलें नाहीं. तात्विक दृष्टीनें राष्ट्रीय सभा अत्यंत लोकप्रिय आहे आणि आमच्या प्रांतातील सर्व लोक त्या सभेविषयीं आपली आदरबुद्धी दर्शित करितात ही गोष्ट आह्मांस विशेष अभिनंदनीय वाटते. सध्यां वर्गणी जमा करण्या विषयीं मोठा प्रयत्न चालूं आहे आणि भावी पीकपाण्याच्या आशेवर लोक तो प्रयत्न सफळ करितील अशी आतां आमची पक्की खातरी झाली आहे.

वऱ्हाडांतील राष्ट्रीय सभेला आधकरीवर्गाकडून व्यत्यय येतील अशी शंका पुष्कळजणांस होती पण उत्तरोत्तर राष्ट्रीय सभेच्या कार्यमालेला अधिकारीमंडळी कडून प्रत्यवाय होणार नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांच्या सांप्रतच्या उदारपणाच्या वर्तनावरून आह्मास वाटतें कीं ही सरकारी मंडळी कायद्यानें देववेल तितकी राष्ट्रीय सभेस चांगली मदत करितील. मे. बुलक साहेब कमिशनर व मे. आबर्ड साहेब जुडिशीअल कमिशनर हे दोघेही मुख्य आफिसर या राष्ट्रीय सभेचें काम उत्तम प्रकारें तडीस जाण्यासाठीं चांगली मदत करितील असे उद्गार पुष्कळ गृहस्थांच्या तोंडून ऐकूं येतात. सरकारी बळ खरोखर अशा प्रकारें मिळेल तर राष्ट्रीय सभा वऱ्हाडांत चांगली भरेल आणि या प्रांतांतील इंग्रजी अंमलाचा नांवलौकिक सर्वत्र विख्यात होईल.

## The Berar Sumachar

MONDAY OCTOBER 4, 1897

√ The next session of the National Congress is fast approaching. It is now high time for our leaders to bestir themselves in right earnestness. Complete and effective arrangements are under consideration and we hope that no pains will be spared to make the next Congress a signal success. Activity is in full play and we are sure that that efforts of our leaders will be crowned with enviable victory in course of time. The first difficulty is to apprise the people of the province of the work that is entrusted to their charge. A province like Berar is not indeed competent for this noble and laborious task of the nation. Energy is ample. Intense patriotism reigns in the hearts of our provincial leaders. To serve the cause of the nation is the predominent idea before them and this central idea has subordinated all their impulses to run in one direction. The recent transition in politics due to the unpleasant end of the trial of the Hon'ble Mr. Tilak, has crippled the energies of many people. Sedition or rather a talk about sedition has become a public danger; and no small apprehensions are entertained by the public in regard to the attitude of the Government towards the Congress. This sort

of uneasiness is not altogether without a slender foundation for it. To dispel all such fears is the first work to begin with. Much of our time is spent in this direction. This has further a bad effect on the collection of subscriptions to the Congress funds. Many people shrink from a public exposure. They will gladly subscribe to the cause of the Congress but they are withheld in a number of wrong influences. However, let it be understood that the National Congress has a holy charm about it. The nobleness of the cause is acknowledged on all hands and, until the local Goverument continues to hold a favourable attitude towards the Congress, we shall make light of the onerous duty in this connection. We go a step further and augur well that our programme of the next Congress is full of solid and substantial promises.

---

The well-known Moulvi Ruffiuddin has penned an eloquent article to refute the idea that the English Raj in India is in danger. We quote some of his remarks:—

"The best alliance is the alliance of self—interest and preservation. Is it the interest of the Amir to risk an open rupture with the British Government to lose his pension, to endanger his dynasty, and to undo all the good that has been done to Afghanistan through him during the last eighteen years? And why? Merely because the concert of the six Great Powers, of which England is one, does not allow the Sultan to have his own way. If Abdur Rahman ever thought of doing a good turn to his brother monarch of Turkey his best course would be to use his friendly influence openly and freely with his ally the British Government in favour of the Sultan. The Amir and the Sultan both would gain more by such means than by any overt or covert defiance of England. It is admitted by all who know that Abdul Hamid, and Abdur Rahman are second to no statesman either in Europe or in Asia in skilful diplomacy. Do British politicians therefore seriously believe than two such monarchs would deliberately plan out and follow a course which would inevitably bring immense harm to both of them? If they really do, the world gives them more credit for shrewdness and common sense than they actually deserve. I maintain that British India is secured against dangers from without.

I shall now proceed to examine the second question, namely. Is the British rule endangered within India more than it has ever been before? In this inquiry it is important that one should single out abnormal facts and events which have taken place this year and given rise to alarming feelings in certain minds. I shall set aside the three scourges of nature—famine, plague, and earthquake—which made their appearance in India in the earlier part of the year, because such calamities might happen in any country and in spite of the best possible administration No reasonable critic would accuse the British nation of indifference to the sufferings of the Indian nation during these visitations. The other abnormal events are: the outrageous murder of two English officers at Poona on the Jubilee day, the riots at Calcutta, and the somewhat widespread rising among the frontier tribes.

Some people believe that the British rule is imperilled in India because the native press, being free, spreads sedition everywhere, and as a consequence they recommend the muzzling of the Press. In the first place, it is a libel to say that the entire, or even the major portion of the native Press indulges in sedition. There are a few disreputable sheets which may be termed seditious. But no one would seriously argue that for the sake of a miserable minority the law should punish a progressive and a well-behaved majority. Secondly, sedition is not created by a free Press; it may be increased through it. If it is then despotic countries like Russia and Turkey, which disallow all freedom of the Press, must be free from sedition. But they are not. The truth is that sedition, in the real sense of the word, hardly exists in India. There is no desire among any community in India to get rid of the British rule. What reasonable people want is the mending and not the ending of the Queen's government."

---

The Lieutenant Governor of the N. W. Provinces has well stated a case of prevention of future famines for the consideration of all local Governments. He observes:—

"The history of past years shows that the climatic conditions of the Province vary considerably from year to year, and yet that all these variations have been generally experienced at some time or other within a cycle (the length of which has been differently estimated by various authorities), after which they repeat themselves. In other words, an accurate account of the agricultural condition of the Province and its individual districts for that cyclical period will afford instances of all the various forms of depression affecting a district, either as a whole or in part, to which that district is ever likely to be subject. If, then, these records of the annual history of a district for the whole period of such cycle of years be compiled with accuracy and intelligence, and so collated as to form a connected and intelligent account of the agricultural history of the district for that period, we should have for all time a valuable and useful guide for Government and for the district officials to the weak points in the agricultural prosperity of each district, and more especially regarding the manner, the extent, and the precise localities in which it is affected by climatic variations. With this object in view it is not sufficient that these records of a district's vicissitudes should be found in annual reports. They should be carefully examined by the Director of Agriculture; where from any cause they are defective, the defect should be rectified at once, the significance of the records of one year compared with its predecessors should be noted; and after every five years all the reports should be collated and the inferences or results set forth in a clear light."

We hope our Berar-authorities will profit by the sad experiences of the last year of famine. The experiences must have taught them to value the safe-guards against agricultural depressions for their immense utility in years of bad seasons. This province has its material wealth centered in the prosperity of agriculture. The rise or fall in agriculture is an index to the goodness or badness of the condition of the people. It is necessary that all preventive measures of famine should be followed with great care and caution. It is an imperative necessity that Government should institute a regular inquiry and formulate such meaures for ready use as the occasion and the circumstances of each province will warrant. The last famine is the first of its kind and it is a matter of pleasure that the local Government has fought very bravely against the calamity. The province which was proverbial for its granary succumbed to the deadly foe in a short time of some few months. Hence we say that the masses are extremely poor and their condition is any thing but satisfactory. The problem is of deep gravity and importance. And we request our local Goverment to give the subject an adequate measure of inqnity and consideration.

---

## वऱ्हाड

हवामान—हस्तनक्षत्राचा पाऊस अजून पडला नाहीं पण ऊन अतिशय तापतें रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं. पीकें चांगलीं जोमांत आहेत.

येथील 'अनाथलय' बंद करण्यांत आलें आणि त्या प्रमाणें इतरत्रही अनाथालयें बंद करण्यांत आलीं.

राव साहेब देवराव विनायक कांहीं मंडळीसह बाळापुरास राष्ट्रीय सभेच्या वर्गणीसाठीं काल सकाळीं गेले.

वऱ्हाड सामाजिक सभेच्या आश्रयाखालीं 'राष्ट्रीय सामाजिक सभा" यंदा उमरावतीस भरणार आहे तेव्हां तिच्या व्यवस्थेसाठीं एक मंडळी नेमण्यासाठिं गेल्या १९ वे तारखेला उमरावतीस रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्या अध्यक्षेतखालीं सभा भरली होती. नागपुराकडील व वऱ्हाडांतील बरीच मंडळी जमली होती. व्यवस्थापक मंडळीचे मुख्य कामगार येणें प्रमाणें नेमण्यांत आले:—

रा० रा० प्रऱ्हाद नारायण जोग— अध्यक्ष

रा० रा० महादेव गंगाधर दामले— सेक्रेटरी

रा० रा० व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर, एडिटर वैदर्भ— सेक्रेटरी

अलिशान रेसिडेन्ट मि० प्लौडन साहेब सिमल्याहून हैदराबादेस परत आल्यापासून निजाम—दरबारांत मोठे फेरफार होणार असल्याची वदंता आहे.

यंदाच्या वकिलीच्या परीक्षेला ४३ उमेदवार होते त्या पैकीं खालील दोघे गृहस्थ पसार झाले:—मि०

(१) रामचंद्र आण्णाजी देशपांडे

(२) वुलियम शाफ्टर.

यंदाच्या राष्ट्रीय सभे संबधाचीं कंट्रॉटें खालील गृहस्थाकडे देण्यांत आली आहेत:—

| मि० | बाब |
|---|---|
| गोकूलदास नारायण-दास व जाफर. | तंबू, टेबल, खुर्च्या वगैरे सामान. |
| लाहूरामजी | सभामंडप |
| रामचंद्र विनायक | कोठड्या व आफिसें. |

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८—८९ रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं (कांठे) | १३० रु० |
| ,, (बनशी) | १४९ रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६॥। रु० मण |
| तूप | ८॥ मण |
| मीठ | ३॥।= मण. |
| सोनें | २९ तोळा |
| चांदी | ७२ |

काशीकर ब्रह्मसमाजाचे एक मिशनरी रा. रा. बलदेव नारायण यांचें काल सांयकाळीं 'युगधर्म' या विषयावर येथील जनरल लायब्ररींत व्याख्यान झालें.

---

ADVERTISEMENT.

**FOR THE BENEFIT OF THE TILAK DEFENCE FUND.**

**A PAMPHLET**

CONTAINING

A FULL AND AUTHENTIC REPORT

OF THE

TILAK CASE

WITH

A PORTRAIT AND SKETCH OF Mr. TILAK'S LIFE.

AND

IMPORTANT PRESS NOTICES ON THE CASE

WILL BE SHORTLY OUT

**PRICE AS 8.**

N. B.—The proceeds after deducting expenses will go to the Tilak Defence Fund.

Names of agents for different Provinces will be published latter on.

Application for the present should be sent direct to Messrs Setlur and Deshpande, Girgaum, Bombay.

---

## वर्तमानसार

सरहद्दीवर लढाई झपाट्यानें चालू आहे. तिकडील रानटी लोक अमिराची मदत मागत आहेत. सरहद्द एकदम काबीज तरी करावी; नाहींतर, त्या रानटी लोकांस स्वतंत्रता भोगूं द्यावी! निकराची गोष्ट घडली पाहिजे.

बंगलोर—म्हैसूर रेलवेवरील मादूर गांवचा पूल वाहून गेल्यामुळें १ सेकंड क्लास व ४ तिसरा क्लासचे डबे नदीच्या पात्रांत पडून शंभरावर मनुष्यें मेलीं. पावसानें जलमय सर्व झालें!

बंगाल्याच्या प्रेस असोशिएशनें गेल्या बुधवारीं असा ठराव केला कीं दुसऱ्या दिवशीं वर्तमान पत्रांनीं नामदार टिळक याच्या विषयीं शोकप्रदर्शन आपले कालमाच्या काळ्या कुळकुळीत रेषांनीं करावें. हा ठराव खरोखर लोकप्रेमाचा उत्तमोत्तम हृदयंगम भाग दर्शवितो.

मि० पेस्तनजी सोराबजी पाठक एम. ए. नांवाचा एक तरुण पार्शी विद्यार्थी सिव्हील सरव्हंटची परीक्षा पसार झाला.

मुरादाबाद येथील जमा उल उलम पत्राचे एडिटर सरकारांत हजर झाले. त्यांच्यावर राजद्रोहाबद्दल खटला चालणार आहे.

प्लेगचा आजार पुण्या मुंबईस वाढत आहे आणि त्याच्या प्रसाराची उत्तरोत्तर तपासणी चालू झाली. एका दिवशीं लेफटेनंट लेविस यांनीं देवालयांत शिरून मूर्तीस विटाळ केला ह्मणून गलबला चालू आहे.

पुण्याच्या प्रसिद्ध खुना संबंधानें चौकशी चालू आहे. एका चाफेकर नांवाच्या माणसाच्या सांगण्या वरून एका जुन्या विहिरींतून हत्यारें, बंदुका वगैरे पोलिसांनीं काढल्या. साठे नांवाच्या मनुष्यास कैद केलें आहे!

होटगी येथील युरोपियन प्लेग डॉक्टरास रात्रीचे वेळीं त्यांच्या बंगल्यांत जाऊन कोणी इतकें बेदम मारिलें कीं त्यामुळें ते घायाळ होऊन अत्यवस्थ आहेत असें कळतें. त्या दिवशीं तेथील अ० स्टेशन मास्तर साहेबाचे बायकोसही बराच मार बसल्याचें ऐकतों. मारणाराचा पत्ता नाहीं.

सरहद्दीवर मधून मधून बऱ्याच चकमकी झडत आहेत. आमचें सुमारें ५.ऊण लाख सैन्य तिकडे गेलें असून तें शत्रूची लवकरच खोड मोडील अशी आशा आहे.

भिकारभोजन.—राणी सरकारच्या डायमंड जुबिलीचे प्रसंगीं त्यांची प्रियजेष्ठ स्नुषा युवराजपत्नी प्रिन्सेस ऑफ वेल्स इच्या सूचनेवरून लंडन येथें जें टोलेजंग भिकारभोजन झालें त्याच्या समारंभाचें वर्णन नुकतेंच एका ठिकाणीं वाचण्यांत आलें. त्यावरून कळतें कीं, हें भिकार तीन लाख भोजनास जमले असून, त्याकरितां ५,४०,००० रुपेय खर्च झाला. त्यांच्या भोजनाकरितां ४० मैल लांब होतील इतकी मेजें मांडलीं होतीं व त्यांचेजवळ दोन्ही बाजूंनीं खुर्च्या ठेविल्या होत्या. मेजांवर अनेक भक्ष्य भोज्य पदार्थ विपुल तयार करून वाढले होते. ह्या भोजन व्यवस्थेकडे १५,००० वाढें लागले असून २० लाख सुऱ्या व कांटे आणि ९॥ लाख प्याले टेबलांवर ठेविले होते. ह्या भोजनसमारंभास २५,००० मण बटाटे, २०,००० मण इतर शाकभाज्या आणि १४,००० मण मांस शिजवावें लागलें. अनेक प्रकारचीं मद्यें तर किती प्रमाणानें लागलीं ह्याची गणती नाहीं. ह्मणू काय एक मोठी मद्याची नदीच ह्या कंगालभोजनाकडे लागली ह्मटल्यास चालेल! ४०,००० ग्यालन तर नुसनी बियर जातीची दारू उडाली! असला वडा भोजन समारंभ इतर कोठें झाल्याचें अलीकडे कोणास माहीत नाहीं, असें तिकडील लोकें सांगतात.

चाळीस मनुष्यें बुडून मेलीं —मध्यप्रांत पैकीं बारेगांव येथें कोल्हार नदीस पूर आला असतां नांव सोडली. ती चालली असतां खालीं पाण्यांत तिची मोठ्या एका झाडाशीं टक्कर होऊन ती उलथली व तीवरील बहुतेक मनुष्यें प्राणास मुकलीं. जे उत्तम पोहणोर होते तेच वाचले.

जर्मनींत ज्याच्या घरीं नौकर असतील त्या घरमालकानें आपल्या नौकराचा विमा उतरलाच पाहिजे असा कायदा आहे.

क० आ०

ब्रिटिश लष्कराची जबर कत्तल.

जनरल जेफ्रिसचे विस्तीर्ण सैन्य शत्रूवर चाल करून जात असतां गेल्या गुरुवारीं माहमाडी लोक त्याजवर एकदम तुटून पडले जनरल साहेब बफ लष्कराच्या रेजिमेंटासह शत्रूचीं खेडें काबीज करून परत येत असतां अंधारामुळें बरोबरील सैन्याची व त्यांची तुटातुट होऊन ते एका खेड्यांत राहिले होते अशा प्रसंगीं त्यांजवर शत्रूंनीं हा हल्ला केल्यामुळें त्यांचा उपाय चालेनासा झाला; पण मेजर वाटरलीज हे शीख लोकांच्या दोन कंपन्यासह त्यांच्या मदतीस येऊन दाखल झाले आणि गाईड रेजिमेंटही मदतीस येऊन. पोंचली तेव्हां बंडखोरांनीं शहरचा कबजा सोडून पळ काढला. या लढाईंत इंग्रजी लष्करचे ९ आफिसर्स आणि १२९ शिपाई ठार व जबर घायाळ झाले. त्यांत मि. बफ् हे ठार झाले व जनरल जेफ्रीज पुष्कळ जखमी झाले आहेत अशी सिमल्याहून तार आली आहे.

दुसरे दिवशीं आलेल्या तारेंत असा मजकूर आहे कीं, वरील हल्ला करून पळाल्यांनंतर क्यापटन कोल यांनीं ११ व्या बंगाल लॅनसर रिसाल्यासह त्यांचा पाठलाग करून त्यांच्या २१ लोकांस ठार केलें. लेफ्टनंट हॅरिंगटन हे अत्यावस्थ स्थितींत आहेत. पंजकोरा येथील पुलाचें संरक्षणा करितां जनरल मॅकाट यास त्यांच्या बुकडीसह पाठविलें आहे. सोखाक व मेरा येथें पांच हजार बोनारवाळ तायफावाले एकत्र जमले होते, व हिंदी लष्कर नवागाई येथें जाऊन पोंचलें होतें.

बरमिंगहाम येथील बंदुकीच्या कारखानदारांस असा हुकूम झाला आहे कीं, सरहद्दीवरील लढाई चालू आहे तोंपर्यंत तीन हजार यार्डापेक्षां दूर गोळी जाईल अशा बंदुका कराव्या. त्यापेक्षां कमी जोराच्या बंदुका रद्द कराव्या. या नवीन हुकुमामुळें जुन्या बंदुका रद्द होऊन नवीन करण्याचा तिकडे धडाका चालू आहे.

जाळून मारलेले सांपडले.

इंग्रजांच्या लष्करांतील कित्येक लोक नाहींसे झाल्यामुळें त्यांच्या शोधाकरितां क्षागरीच्या किल्ल्यावरून एका रिसाल्याच्या तुकडीस पाठविलें होतें. किल्ल्यापासून एक मैलाचे अंतरावर शिनवारीच्या रस्त्यावर कित्येक मुडदे पडलेले त्यांच्या पाहण्यांत आले. हे मरून पडलेले लोकें शीख पलटणींतील स्वयंपाकी वगैरे होते व ते सर्पण गोळा करण्याकारितां गेले होते असें ह्मणतात. बंडखोरांनीं त्यांचे हातपाय बांधून त्यांचे कपड्यास आग लावल्यामुळें ते जळून व तरफडून मेलेले दिसत होते.

सरहद्दीवरील धामधुमीस दिवसेंदिवस जास्त स्वरूप येत चालल्यामुळें अमदाबाद वगैरे कडील लोक ब्यांकेंतील आपल्या ठेवी परत घेऊं लागले आहेत.

भयंकर अपघात—मद्रासहून आलेल्या तारेवरून असें समजतें कीं, २४ तारखेस ९।४५ वाजतां एक पासेंजर ट्रेन बंगलोरहून ह्मैसूरास जात असतां मुडून स्टेशनाजवळील नदीच्या पुलावर गाडी येताच, तो पूल नदीच्या महापुरानें ढासळा असल्यामुळें एंजिनसह तिसऱ्यां वर्गाच्या उतारूंचे तीन डब्बे एकदम तुटून नदींत पडले. ह्या अपघातांत एकंदर किती लोक बळी पडले हें जरी अद्याप नक्की समजलें नाहीं, तथापि पुष्कळ प्रेतें नदींत सांपडलीं आहेत.

नुकतेंच एका रात्रीं हुगळी नदींत एका मचव्यावर कांहीं चाचे लोकें एका हिरव्या होडीमधून येऊन चढले आणि त्यांनीं खलाशांना पळवून लावून त्या मचव्यावरचा सारा किंमती माल लुटला व पोबारा केला. पोलीस त्या लोकांचा शोध करीत आहे.

कोकणसर्व्हेपार्टीमधील नेने आडनांवाच्या कारकुनानें गुप्त पोलीसाकडे जाऊन मी ऱ्यांड व आयर्स्ट ह्यांचे खून करणाराचा तपास लावून देतो असें कळविल्यावरून त्याजबद्दलचा विशेष तपास चालू आहे असें समजतें. सदर नेने आपल्याला भविष्यवादी व ज्योतिषी ह्मणवितो असेंही कळतें. स० वि०

आपल्या तरतरींत ज्ञानानें जपानानें अगदीं थोड्या मुदतींत आपल्या व्यापारास कशी तेजी आणली हें ध्यानांत ठेवण्या सारखें आहे असें विलायती लोकांचें ह्मणणें आहे.

जे ब्राह्मण शव उचलतील त्यांस चांदणी पाहून भोजन करण्याची अट आहे ती दूर केली आहे असा वार्शी येथील ब्रह्मवृंदांनीं ठराव केला आहे. आमचे येथें! वार्शीस सर्वांनीं मृताचे घरीं आलें पाहिजे, न आल्यास १। रुपया दंड ठरविला आहे. कोमटी ज्ञातींत येथें असाच नियम आहे. सर्व ज्ञातींतील बहुधा नियम पाळले जातात पण ब्राह्मणांतच विक्षोभ येण्याचा संभव कां असतो! येथील ब्रह्मवृंदानें या बाबतींत जरूर विचार करून कांहीं तरी ठरीव नियम करावेत. सर्वांवर सारखा प्रसंग आहे. दी० बं०

अहमदनगरच्या कांहीं ब्राह्मणांनंर लष्करांत मेसहौस मध्यें जाऊन तेथें मांस मद्यावर यथास्थित ताव मारला असा आरोप आला होता. तो चौकशी अंती शृंगेरीच्या स्वामींनी दूर करून नगर संकेश्वर मठा खालीं मोडत नाहीं ह्मणून ठराव दिला

एक बाई पन्नास वर्षें मौन धरून होती पुढें ती बोलण्याला प्रयत्न करूं लागली तों तिला बोलतांच येईना स्नायूंनीं पेनशन घेतलें होतें!

खटपट—एक मोठा कालवा खणून जपानचा समुद्र पासिफिक महासागरांस जोडण्याची खटपट जपान देशी चालू झाली आहे.

फूल—मद्रास एथील वनस्पती शाळेंतील एका झाडाला एक फूल आलें असून त्याची लांबी ४६ इंच व रुंदी १४ इंच आहे. रंग पांढरा व तांबडा आहे- धा. वृ.

मंडी ( उत्तर हिंदुस्थान ) राज्यांत हल्लीं एक रुपयास २० शेर गहूं, तेरा शेर तांदूळ आणि दोन शेर तूप ह्या प्रमाणें भाव आहे.

गतवर्षीं फ्रेंच लोकांचे भक्षणांत ( फक्त पारिस नगरामध्यें ) २३,३९६ घोडे, ४३९ गाढवें आणि ४९ खेचरें इतकीं जनावरें आलीं! अरे राम राम राम!!! डुकरें, बकरीं, मेंढरें आणि बैल या चतुष्पादांची गणतिच नाहीं!

फार मोठा घण—ईस्टइंडिया रेल्वे कंपनीनें आपल्या जमालपूर येथील कारखान्यांत एक ८४ मण वजनाचा घण तयार केला असून तो घण यंत्रानें चालावयाचा आहे. हा घण तयार करण्यात सदर कंपनीला २३००० रुपये खर्च आला.

मोठी देणगी —कै० सर मंगळदास नथु भाई यांणीं आपल्या मृत्युपत्रांत एकंदर आपलें जिंदगीचा कांहीं भाग मुंबई युनिव्हर्सिटीकडे गरीब लोकांच्या विद्योत्तेजनार्थ छात्रवृत्तींची वगैरे योजना करून द्यावी असें लिहून ठेवलें आहे. सदर भाग आजपर्यंत मयत गृहस्थांच्या मुलांत जिंदगीच्या वाटणीचे व विभागाचे वगैरे संबधानें जे वादविवाद चालले होते त्यामुळें युनिव्हर्सिटीकडे आला नाहीं. परंतु ते त्याचे आपसांतले वादविवाद असेच आणखी कित्येक वर्षे चालतील ह्याचा नियम नसल्यामुळें सरासरीनें मयत गृहस्थानीं जो भाग ठेविला आहे तितके रुपये ह्मणजे ३॥ लाख रुपये द्यावे अशी सूचना नाम. न्या. मू. रा. ब. रानडे यांणीं केल्यावरून ती सर्वानुमतें पास झाली!!

शेतकी खात्याची परीक्षा—आजपर्यंत शेतकीच्या कालेजांतील परीक्षेला फक्त म्याट्रिक परीक्षा पुरी असे परंतु सरकारानें शिफारस केल्यावरून युनिव्हर्सिटीनें त्या परीक्षेस ह्या पुढें पी इ. परीक्षा पास झालेले उमेदवार घ्यावे घेण्याचा ठराव मागील आठवड्यांत जी यूनिव्हर्सिटीसिनेटची सभा भरली होती तींत पसंत करण्यांत आला. उत्तरोत्तर परीक्षायंत्र फार वाढत जाऊन त्यामध्यें उमेदवारांचा चांगलाच चुरा होत आहे. ही फार खेदाची गोष्ट आहे! ह्या पुढें शेतकीकडील ग्राज्वेटाला मामलेदार होण्याचा बी. ए. पदवीधरांपेक्षां विशेष प्रसंग येईल व शेतकीकडील ग्राज्वेट बी. ए. पदवीधरापेक्षां मामलेदार होण्यास अधिक पात्र आहेत; असें डा. कीखन यानीं त्या परीक्षेचें महत्व वर्णन करितांना बोलून दाखविलें. ज्ञा. च.

बेहरिंग येथें भरणाऱ्या दर्यावा संबंधाचे कान्फरन्समध्यें जर जपान व रशिया हे सामील होतील तर इंग्लंड त्या सभेंत मिसळणार नाहीं, कारण वरील दोन्ही राजांस त्या सभेंत दाखल होण्याचा अधिकार नाहीं असें इंग्लंड युनायटेड सरकारास कळविलें आहे.

पारीस येथील 'पोलिटिक कोलोनियल' पत्रावरून असें कळतें कीं, इजिप्तसंबंधाचे प्रश्नाविषयीं हल्लीं रशिया, इतर राष्ट्रें व टर्की यांचा दरम्यान पत्रव्यवहार चालू झाले आहेत कीं, इंग्लंडपासून इजिप्तचा कबजा घेण्यासंबंधानें लवकरच तजवीज करण्यांत येणार आहे.

रहदारीच्या रस्त्यावर भीक मागण्याच्या आरोपावरून सुमारें १०० भिकाऱ्यांस पोलिसांनीं पकडून दरबारांत उभे केलें होते. त्यांपैकीं ३० इसमांस प्रत्येकी एक दिवसाची कैदेची शिक्षा माजिस्ट्रेट मि. दस्तुर यांनीं दिली व बाकीच्यास माजगांवें पो. कोर्टातून वरीलप्रमाणें शिक्षा ठराठावण्यात येऊन, भीक मागावयाची असल्यास मुंबई सोडून बाहेरगांवीं जावें अशी सर्वास ताकीद देण्यांत आली आहे.

तुर्की वर्तमानपत्रापेक्षांही, इजिप्शियन व आरबी वर्तमानपत्रांत सरकारा विरुद्ध लोकांचीं मनें गढूळ करण्या सारखें लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें तीं पत्रेंही हिंदुस्थानांत येऊं देण्याची बंदी करावी अशी केरो येथील एका इजिप्शियन पत्राच्या एडिटरानें लंडन येथील स्टयांडर्ड पत्रांतून हिंदुस्थान सरकारास सूचना केली आहे. काय, राजद्रोहाचे चोहींकडेच खूळ माजलें आहे.

गुराखी.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .........................६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... ........०१

Six monthly........ 3 ..........
Single copy ..........................
Advertisement
Below 10 lines ...... 2
Per line over 10 ...... 4
Repetition Peline...... 3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 11 OCTOBER 1897 — NO 40

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ११ माहे आक्टोबर सन १८९७ इ० — अंक ४०

### जाहिरात

नाशिकचा माल

चांदी, पितळ, व तांबे वगैरेचीं भांडीं उपकरणीं वगैरे सोन्याचे दागिने सुद्धां हरएक प्रकारचा माल घेऊन व्हीं. पीनें पाठवूं. कमिशन रुपयास ६ पै.

पत्ता— आबाजी सिताराम मोडक
नासिक

---

### विजयादशमीचें सोनें

FREEDOM AND LOVE

How delicious is the winning
Of a kiss at love's beginning,
When two mutual hearts are sighing
For the knot there's no untying !
Yet remember, 'midst your wooing,
Love has bliss, but Love has ruing;
Other smiles may make you fickle,
Tears for other charms may trickle.
Love he comes, and Love he tarries,
Just as fate or fancy carries;
Longest stays, when sorest chidden;
Laughs and flies, when press'd and bidden.

Bind the sea to slumber stilly'
Bind its odour to the lily,
Bind the aspen ne'er to quiver,
Then bind Love to last for ever.
Love's a fire that needs renewal
Of fresh beauty for its fuel;
Love's wing moults when caged and captured,
Only free, he soars enraptured.
Can you keep the bee from ranging
Or the ringdove's neck from changing ?
No ! nor fetter'd Love from dying
In the knot there's no untying.

*T. Campbell*

स्वेच्छेनें दयिता मुखांबुज सुधा लाजोनि ती अर्पिता ।
प्रारंभीं रतिच्या प्रमोदभर तो लोटे मनीं तत्वतां ।
त्या कालीं बहुसानुराग असती दोन्हीहि चित्तें स्वयें ।
प्रेमाचा दृढ संधि–त्या शिथिलता ठावो नसे निश्चयें ॥ १

ठेवावी मनुजें परंतु मनि हें गोष्टीहि रत्युत्सवीं
देतो सौख्य अपार तेवि विपुल क्लेशासि तो कामवी ।
होई चंचल चित्त देखुनि दुजी तन्वी सुहास्यानना
लीला मोहक पाहुनी जलदि वा येईल तत् लोचना ॥२॥

वाटे राग पळांत वा शिथिलता येते तया तत्वता
सुत्रें ही भवितव्यता करिं धरी वाती मनो लौल्यता ।
राहे तो चिरकाल मात्र जरि तत्सिद्धासि तें विघ्न ये
आशाभूत नरास तुच्छ गणितो. सोडी त्वरें निश्चयें ॥३॥

राहे काय कधीं प्रशांत उदधी होऊनि वीचिक्षय ।
राहे गंध फुलांत, ये न वरती ऐसें कशाला भय ॥
लज्यालू लतिका न हालवि कदा पर्णें नहें संभव ।
एकाचि स्थलि त्या परी न कधींही कामासि या राहवें ॥ ४ ॥

येथें उज्वल काम हा दिसतसे संदीप्त वन्ही परी ।
तन्वी सुंदर इंधन प्रबल तें लागें सदां त्या वरी ॥
होतां पंजर बद्ध राग दिसतो तो लुप्त पक्ष; स्वयें ।
जेव्हां स्वैर, विहंगसा उडतसे हर्षोद्भरें निश्चयें ॥ ५ ॥

हिंडे षट्पद वाटिकांतरि-कसा तो मानवा आकळे ? ।
कालें सम विभिन्न वर्ण दिसती त्या पोपटांचे गळे ॥
तैसा पंजर बद्ध राग हलके जातो लयासि स्वयें ।
प्रेमाचा दृढबंध–त्याशिथिलता ठावी नसे निश्चयें ॥ ६ ॥

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आश्विन कृष्ण १ शके १८१९

---

डाक्टर एफ. ओमोरी हे जपान सरकारचे भूकंपशास्त्रवेत्ते आहेत. हे भूशास्त्रांत प्रोफेसर असून भूडोलांचीं कारणें, ते टाळण्याचे उपाय, भूडोल होत असतांना करावयाच्या व्यवस्था इत्यादि गोष्टी विषयीं मोठ्या शोधकवृत्तीनें चौकशी करित आहेत. भूकंपाचा हेलकावा ज्या ज्या देशांस बसला ते ते देश पाहण्यासाठीं या प्रोफेसरांनी हल्लीं पर्यटन चालविलें आहे. त्यांची स्वारी हल्लीं इंडियांत असून आसाम येथील गेल्या धरणीकंपाबद्दल त्यांचा शोध चालू आहे आसामांतल्या पेक्षां जपानचा धक्का भयंकर होता. जून महिन्यांतील धरणीकंपा विषयीं प्रोफेसर ओमोरी लिहितात कीं हा धरणीकंप भूगर्भांतल्या २० किंवा ३० मैल खोलीवर असावा आणि याची उभी गती प्रत्येक सेकंडाला पांच इंचा इतकी असावी. या भूडोलाला ज्वालाग्राही पदार्थांचें संकरण हें कारण नसावें. बहुतकरून भूगर्भांत २० किंवा ३० मैलाच्या खोलीवर कांहीं विलक्षण प्रकारची हालचाल झालेली असावी. भूकंपानें नेहमी बांधकामाला धक्का बसतो असा अनुभव आहे आणि ह्मणूनच चुनाविटांच्या इमारतीपेक्षां लाकडी इमारती भूकंपाच्या वेळीं चांगल्या टिकतात. तेव्हां आसामच्या भागांत पुन्हा इमारती बांधतांना ह्या गोष्टीचा विचार करण्यांत येईल असें आह्मांस वाटतें. घडलेल्या भूकंपाबद्दल प्रोफेसर साहेबांनीं दोन मुख्य परिणाम कळविले. ओतीव लोखंडी पाण्याच्या नळांचें मोठें नुकसान झालें आणि असें उदाहरण पाहिलेंच आहे. भूडोलाचें चित्र मि. लॉ. ट्राचींनीं काढलें आहे आणि तें शोध करितांना फार उपयोगीं पडतें. भूडोलांचें बरोबर प्रतिबिम्ब या चित्रांत उत्तम उतरलें आहे आणि या चित्रदर्शनानें भूडोलाच्या गतीचा देखील बोध होतो. या दोन गोष्टी ध्यानांत धरण्या सारख्या आहेत. हे प्रोफेसर इंग्लंड, इटाली वगैरे देशांतून प्रवास करून आले आहेत. जपानांत भूकंपाच्या शास्त्राविषयीं शोध करणारी एक मंडळी नेमण्यांत आली आहे; आणि या अलिकडील प्राच्य राष्ट्रांत शास्त्रज्ञ मंडळी उदयास येत आहेत हें मोठें आश्चर्य होय.

---

तीनशें यार्डी पलिकडील निशाणाच्या बंदुका इंडियांत इंग्लंडांतून येऊं नयेत ह्मणून सरकारानें ठराव केला होता. या ठरावाचा हेतु असा कीं सर हद्दीवरील लोकांस बंदुकांचा पुरवठा होऊं नये. या हुकुमाचा परिणाम असा विचित्र झाला कीं बेलजम मधील बंदुकांच्या मोठ्या कारखानदाराजवळ पुष्कळ मागण्या आल्या आणि दहा हजारावर बंदुका इराणच्या बंदरांतून सरहद्दीवरल्या लोकांकडे जाऊं लागल्या. एकंदरीनें सरकारचा हेतु फसला. शेजारणीनें कोंबडा झांकून ठेविला ह्मणून कांहीं उजाडावयाचें रहात नाहीं.

---

सरहद्दीचें प्रकरण पुष्कळ वर्षांपासून चालूं आहे. तें उपस्थित झाल्या पासून सरहद्दीवर लढाया चालू आहेत. हें सरहद्दीचें प्रकरण ह्मणजे कायमच्या लढाईची ध्वजाच होय. सरहद्दीवरील कडवे, रानवट व डोंगराळ लोक मूळचे स्वतंत्र आहेत; आणि त्यांच्या प्रांतांत इंग्रजी पैगम चालू लागल्या बेरोबर त्या लोकांस सर्व कुलक्षणें कळून चुकलीं. आपला प्रांत इंग्रजांनीं काबीज करावा. आपली स्वतंत्रता नष्ट व्हावी आणि परकीय अंमल चालावा ही गोष्ट त्या लोकांस मरणप्राय वाटली. लढाईला कांहीं तरी कारण निघालें आणि इंग्रज सरकार हा डोंगराळ प्रांत हळू हळू पादाक्रांत करीत चाललें आहे. दारूगोळ्यांनीं परिपूर्ण अशा तोफखान्य न डिणगी पडावी आणि निमिषमात्रांत सर्व आभाळ फाटावें व पृथ्वी दुभंग होत जावी तशी गोष्ट आहे. इंग्लिश लष्करा बरोबर निकरानें, धैर्यानें व प्राणाची परवा न करितां सरहद्दी वरील रहिवाशी सामना देत आहेत. इंग्रजी फौज चोहोंकडून तेथें एकत्र होत आहे आणि हल्लींच्या लढाईच्या प्रसंगांत सरहद्दीच्या लोकांचा समूळ उच्छेद होईल असा रंग दिसतो. उभय पक्षीं कत्तली चालूंच आहेत, शेकडों लोक धारातीर्थी गतप्राण होत आहेत आणि इंडियाचा पैसा पाण्या प्रमाणें खर्चला जात आहे. लढाईचे अनर्थ कल्पनेनें चांगले कळतात, आणि सरहद्दीच्या लढाई पासून इंडियन राष्ट्राला कांहीं वास्तविक फायदा होईल असें आह्मांस वाटत नाहीं.

राशियाचें पाऊल उत्तरेच्या डोंगरी मार्गानें इंडियांत पडूं नये ह्मणून कडेकोट बंदोबस्ती करण्याच्या हेतूनें सरहद्दीवर शिबंदी ठेविली, व सर्व रस्ते बंद केले. तथापि राज्यतृष्णा कांहीं मंदावली नाहीं. सरकारला तिनें वेडें केलें नाहीं असें धरलें तर आह्मास या लढाईचें प्रयोजन दिसत नाहीं. या आठवड्यांतील लढाईच्या खबरा मोठ्या आनंदकारक आहेत. इंग्रजी फौजे पुढें सर्व शत्रु शरण आल्या मध्येंच जमा आहेत, हडा मुल्ला वगैरे सर्वजण प्राण घेऊन लपले, आणि गांवांची गांवें उध्वस्त झाल्यावर हस्तगत झाले आहेत. लढाई झाली ती यथान्याय असो अगर नसो, ही लढाई लवकरच इच्छित मनोरथ पूर्ण करीत आहे हें मोठें आनंदकारक वर्तमान होय. इंग्रजी विजयशाली बाहुटा फडकूं लागला हें उत्तम झालें. पण या मुळें इंडियाला राज्यविस्ताराच्या दृष्टीनें कांहींच फायदा नाहीं. तो सरहद्दीवरचा मुलूख मिळाला आणि न मिळाला तरी लाभदृष्टीनें तो कांहींच किंमतीचा नाहीं. त्या डोंगराळ लोकांवर प्रभुत्व मिळविल्यानें कांहीं पुरुषार्थ केला असें देखील जग ह्मणणार नाहीं. सरहद्द वाढली पण तत्याचे व लढाईचें मूळ बीज कांहीं अंतरावर लांबलें इतकाच या लढाईचा अर्थ आह्मास दिसतो.

---

चलनी नाण्याला मदतनीस सरकारी नोटा असतात. या नोटा इंडियांत आठ निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या आहेत. एका भागांतील नोटा दुसऱ्या भागांत चालतात परंतु कांहीं बट्टा त्यावर द्यावा लागतो. प्रत्येक नोटीवर त्या त्या भागाचें नांव, नोटीची निशाणी व नंबर, तारीख, महिना, सन, इत्यादि गोष्टी छापलेल्या असतात हें बहुतकरून सर्वांस माहित आहे. ज्या ज्या भागांत स्वतंत्र नोटा लागतात त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—कलकत्ता, अलाहाबाद, लाहोर, मुंबई, कराची, मद्रास, कलिकत, व रंगून. या नोटी किंमतीच्या भेदानें अवि-

च असतात. ५, १०, २०, ५०, १००, ५००, १०००, व १०००० रुपयांच्या अशा आठ प्रकारच्या किंमतीच्या नोटा असतात. प्रत्येक नोट आपली किंमत त्यावरील छापील अंकानें दर्शविते. सन १८९६ च्या मार्च अखेरीस इंडियांत चालूं असलेल्या नोटांची सांकेतिक किंमत रुपये २९,९४,०६,९९० होती परंतु त्या नंतरच्या बारा महिन्यानंतर १८९७ च्या मार्च अखेरीला अशा नोटींची एकंदर किंमत २३,७९,२३,०७० रुपये होती. चालूं असलेल्या नोटामध्यें प्रत्यक्ष लोकांपाशीं असलेल्या नोटा व ब्यांकेतून शिलक असलेल्या नोटा या उभयतांचा समावेश होतो. लोकांस रोख नाण्यांची चणचण पडली ह्मणजे नोटांची ब्यांकेंत गर्दी होते आणि तशीच चणचण नसली ह्मणजे लोकांच्या व्यवहारांत नोटा अधिक चालतात. उदाहरणार्थ सरकारि टांकशाळेंतून व्यापारी लोकांस नाणीं पाडून न देण्याविषयीं कायदा झाला तेव्हां कांहीं कालपर्यंत सरकारि नोटा पेक्षां चलनी नाण्याविषयीं अधिक मागणी लोक करीत होते. गेल्या १८९६–९७ सालांतील नोटांचा हिशोब किंमतवारीनें असा होता कीं:–·–

| किंमत रुपये | नोटांची संख्या |
|---|---|
| ५ | ६०९६१२ |
| १० | ४६९९६७८ |
| २० | ३६२६९९ |
| ५० | २३०६१३ |
| १०० | ६०५२८६ |
| ५०० | ४७६०३ |
| १००० | ५५६११ |
| १०००० | २८७७ |

येणेंप्रमाणें ६६१३९०० नोटांची किंमत २३७९२३०७० रुपये आहे.

सरकारापाशीं रोख रुपयांचीं नाणीं आहेत यांची किंमत रुपये १३, ७९, २३, १२४—६ आणे आहे. एकंदर नोटींच्या किंमतीच्या मानानें सरकारापाशीं शेंकडा ५६ या प्रमाणानें रोख शिल्लक आहे. या रोख शिलकी शिवाय लोकांनीं सरकारापाशीं व्याजी ठेविलेल्या ठेवींची किंमत रुपये १०, २०, ८१, ५०० असून त्यांत शेंकडा ३ ½ व्याजाच्या ठेवी ८,१५,९५,००० रुपयांच्या आहेत व बाकींच्या ठेवी ३ व्याजाच्या दराच्या आहेत. एकंदरीनें, रोख नाणीं व ठेवी मिळून जेवढ्या किंमतीची होतात त्याच किंमतीच्या नोटा सरकारानें काढलेल्या आहेत.

चालूं चलनी नाणीं सन १८३५ सालीं प्रथम निघालीं. त्या वेळीं राजा वुलियम ४ था होता. त्या साला पासून १८९३ पर्यंत एकंदर ३,३५,५८,९९,६७६ रुपये किंमतीचीं नाणीं पाडण्यांत आलीं. कलकत्ता, मद्रास, व मुंबई या तीन ठिकाणीं टांकसाळी होत्या. पुढें १८६२ सालचीं नाणीं पाडल्या नंतर मद्रासची टांकसाळ बंद झाली. आरंभीं वुलियम ४ च्या मुखवट्यांचीं नाणीं १८४०, व १८६२ सालीं राणी सरकारच्या मुखवट्याचीं नाणीं पाडण्यांत आलीं आणि त्या पुढें १२ वर्षांनीं १८७४ साला पासून १८९३ पर्यंत राणी सरकारच्या मुखवट्याचीं नाणीं सालोसाल कलकत्यास व मुंबईस पडत आलीं.

जुनीं नाणीं रद्द करण्या साठीं कित्येक वर्षां पासून प्रयत्न चालू आहे आणि १८३५ १८४०, व १८६२ या सालच्या छापाचे पुष्कळ रुपये भूमिगत झाल्यामुळें त्यांचा अद्याप थांग लागला नाहीं. पण अलिकडे टांकसाळी खानगी व्यापाऱ्यांस बंद झाल्या पासून पुष्कळ जुने रुपये सरकारांत येत आहेत आणि पूर्वी प्रमाणें लोक रुप्याच्या दागिन्या साठीं रुपये ओतीत नाहींत ह्मणून जुने रुपये अधिकाधिक व्यवहारांत आढळतात.

सरकारी नोटी संबंधानें लबाड्या अनेक होत असतात. सरकारी नमुन्याच्या खोट्या नोटी चालवितांना यंदा ६२ नोटी उजेडांत आल्या. बक्सार येथें कांहीं लबाडांनीं कांहीं नोटी इतक्या बेमालूम बनविल्या कीं ब्यांकेमध्यें देखील त्याचा नक्कलीपणा उघडकीस आला नसतां. हल्लीं हा खटला पोलिसांच्या चौकशींत आहे. अशा लबाड्या बंगाल्यांत व मद्रासेस विशेष दृष्टीस पडल्या. कलकत्यास व मद्रासेस कांहीं जणांनीं पूर्वीं दाखल झालेल्या अर्धे भागाच्या नोटींच्या दुसऱ्या अर्धे भागावर पुन्हा पैशाची मागणी ब्यांकेवर केली परंतु त्याला अखेरीस शिक्षा झाली.

मोठ्या समाधानाची गोष्ट कीं मि० ऱ्यांड व लेफ्टनेंट एअर्स्ट यांचा खून करणारा पत्यांत आला. या दोन खुनांचा नापत्ता असल्यामुळें मुंबई सरकारानें सर्वत्र दाणादाण करून सोडली होती आणि या दाणादाणींत पुष्कळ जणांस दुसऱ्याच्या पातकांचें प्रायश्चित्त मिळालें ह्मणून दुःख वाटतें. संसर्गाचा दोष एवढा भयंकर असून तो सर्पाच्या गरळा सर्वत्र भोवंड आणितो. हल्लीं प्रसिद्ध झालेल्या हकीकतींत ही बातमी कशी फुटली याचा वृतान्त गुलदस्तांत आहे. वेद शा० सं. रा. रा. हरिभाऊ चांफेकर ह्मणून पुण्यास उत्तम कथेकरी आहेत. हे मुंबईसही रहात असतात. त्यांस तीन मुलें २८।२४ व १६ वर्षांचीं आहेत. त्यांचीं नांवें दामोदर, बाळकृष्ण, व वासुदेव हीं होत. या पैकीं मुख्यत्वें करून दामोदर व बाळकृष्ण यांनीं पुण्याचे खून केले असें बाहेर आलें आहे. दामोदर हा शरीरानें धष्टपुष्ट, हिंमतवाला व लष्करी बाण्याचा आहे. यानें अपराध कबूल केला आहे. ही स्वारी हल्लीं पोलीसाच्या कैदेंत आहे. दामोदर विलक्षण तालीमबाज असून शस्त्रास्त्रविद्येंत याची निपुणता मोठी आहे. सुमारें साडे तीन वर्षां मागें दामोदर व बाळकृष्ण या दोघांनीं शाळांतील शेंदोनशें मुलांची एक टोळी बनविली आणि त्यांस दांडपट्टा, गोफण मारणें, बोथाटी खेळणें वगैरे खेळ उत्तम शिकविले. नंतर मजल तलवारी वगैरे हत्यारांवर पोंचली. हत्यारें चोरून लपवून पैदा केलीं. परंतु गोफणीनें एकाचा डोळाच फुटत होता ह्मणून टोळी फुटली. आणि दाहावीस जणांचा एक तालीमखाना सुरूं झाला. पुढें दामोदराला वाटलें कीं लष्करांत चाकरी धरावी आणि नांव मिळवावें. पुष्कळ ठिकाणीं प्रयत्न केला पण सर्वत्र तो फसला. कम्यांडर इन चीफ परवानगी देतील तर ही स्वारी एक निराळी आपल्या मंडळीची पलटण तयार करणारस तयार होती. दामोदरच्या मनाला तिटकारा व त्वेष चढला; आणि तेव्हां पासून त्यानें विलक्षण पण भयंकर गोष्टी करण्याचा क्रम चालविला. महाराणी व्हिक्टोरियाचा जो उभा पुतळा मुंबईस आहे तो या राजश्रीनें डांबरानें विद्रुप केला आणि त्याच्या गळ्यांत खेटराची माळ घातली. ही गोष्ट त्यानें फार गुप्तपणानें केली. प्लेगमुळें मुंबईला विद्यार्थी परीक्षेला येण्याला भीत होते परंतु युनव्हरसिटीनें त्यांच्या कुरकुरीला जागा दिली नाहीं ह्मणून परीक्षेचा मांडव या दामोदरानें जाळून फस्त केला. पुण्यास मि. ऱ्यांड यांची प्लेगची व्यवस्था लोकांस जुलूमाची वाटली ह्मणून त्यांचा खून करण्याची खटपट दामोदरानें अनेक वेळा केली पण ती साधली नाहीं. आपल्या कार्याच्या सिद्धतेसाठीं यानें चोरीच्या द्वारानें बंदुक, रिव्हालर वगैरे गोळा केलीं आणि अखेरीस त्या जुबिलीच्या राष्ट्रोत्सवाच्या दिवशीं दामोदरानें आपल्या भावाच्या मदतीनें दोघा ब्रिटिश आफिसरांचे खून केले!

दामोदरानें विहिरींत टाकलेलीं सर्व हत्यारें पोलिसाला दाखवून दिलीं. दामोदराच्या माथीं बांबे ग्याझिटकारांनीं प्रोफेसर वेलणकर यांस बेदम मारण्या बद्दलचा ही आरोप लादला आहे. दामोदराची वीरश्री राज्यकर्त्यांस शोभणारी झाली असती पण ती वाफे प्रमाणें कोंडून राहिल्यामुळें हा अनर्थ ओढवला! पुण्याच्या खुनाचा निकाल लवकर लागो आणि खुनी फांशीवर चढोत! मुंबई सरकार संशयानें व वहिमानें वेडें गेलें आहे; आणि वस्तुस्थिती देखील तशीच वहिमाला कारणीभूत आहे. पोलीसचा तपास काय काय गोष्टी कळवील त्या ऐकण्याकडे मनें उत्कंठित आहेत. पण पूर्वी सरदार नातूं यांच्या दोघा चाकरांनीं खुना बद्दलचा कबूली जबाब दिला होता. तेव्हां दामोदर खरा किंवा दोन चाकर खरे! कबूली जबाबांत ही ईर्षा विलक्षण दिसते!

---

डाक्टर जे. डब्ल्यू. लेदर सरकारी रसायनशास्त्रज्ञ यांनीं इंडियांतील तेल धान्या संबंधानें एक महत्वाची सूचना केली आहे आणि ती सूचना या देशाला मोठी फायद्याची आहे. वऱ्हाडांत तेल ज्यापासून काढतात अशीं धान्यें पुष्कळ पीकतात ह्मणून हा विचार या प्रांताला देखील विशेष लागूं पडतो. विलायतेस तेल धान्यें पाठवितात त्यामुळें या देशाचें मोठें नुकसान होत आहे. तेलधान्यें विलायतेस गेल्यामुळें तेल काढल्या नंतर जी पेंड रहाते ती विलायतवाल्यांस मिळते. तेल जर इंडियांत काढलें असतें तर पेंड गुरांस खाण्याच्या उपयोगी पडली असती किंवा जमिनींत खता ऐवजी उपयोगांत आली असती. कांहीं धान्याची पेंड गुरें खातात आणि जी पेंड गुरें खात नाहींत ती खता ऐवजीं उपयोगीं पडेत. तीळ, करडी, जवस, भुईमुग, एरंडी, वगैरे धान्या पासून तेल निघतें आणि त्याची पेंडही मोठी उपयोगी आहे. इंडियांत धान्यें जितकीं पिकतात त्यांचा ¾ भाग निदान विलायतेस जातो. १ टन धान्या मागें ४६ ग्यालन तेल निघतें आणि ५८००० टना पेक्षां अधीक टन धान्य सालोसाल विलायतेस जात आहे. हें इंडियांत उपयोगांत आलें असतें तर मोठा फायदा देशाचा झाला असतां. प्रथम तेलधान्यें ज्या प्रांतांत पुष्कळ पिकतात तेथें तेलाचे कारखाने या देशांत निघाले पाहिजेत, अनुभवानें असें ठरतें कीं तेलाचा कारखाना निघाला तरी तेलाचा खप फारसा होत नसल्यामुळें कारखाना फायदेशीर पडत नाहीं. तेलाचा खप खरा ह्मणजे खाण्याच्या व जाळण्याच्या कामीं होतो तो नव्हे. तेलाचे उपयोग रंगण वगैरे तयार करण्याकडे होत गेले पाहिजेत याचा अर्थ असा कीं तेलाचा योग्य विनियोग करणारे कारखाने निघाल्या शिवाय तेलाचे कारखाने देखील चालणार नाहींत. अशी ही कार्यकारणमालेची शृंखला परस्परावलंबी आहे. तेव्हां सध्याच्या मनूला तेलाचा उपयोग करून निरनिराळे पदार्थ बनविणारे कारखाने आमच्या देशांत निघतील तर या देशाचा मोठा फायदा होईल. तेलधान्यें पुष्कळ पटीनें लोक पिकवितील, तेलाचे कारखाने निघून उद्योगधंदा वाढेल, आणि या कारखान्याला अनुषंगिक निराळे कारखाने निघतील. देशी भांडवलाचा उपयोग या गोष्टी कडे करविण्याची सूचना डाक्टर लेदर यांची फार चांगली आहे आणि तिचा स्वीकार धनद व बुद्धिमान लोक कारितील अशी आह्मांस आशा आहे.

---

खऱ्या मित्राची थोरवी कांहीं विचित्र आहे! मित्ररत्ना सारखें दुनियेंत दुसरें शहाजोग रत्न नाहीं. नामदार बाळ गंगाधर टिळक यांनीं मतस्वातंत्र्या साठीं, वर्तमानपत्रकर्त्यांच्या हक्का साठीं, व देशहिता साठीं माफीसमर्पण नाकारलें, काळ्या पाण्याच्या शिक्षेच्या अपराधाची शहानिशा करून घेतली आणि अखेरीस बंदिखाना देखील स्वीकारला. हा स्वार्थत्याग अप्रतिम, खऱ्या निर्वाणीचा, व लोकवंद्य आहे. त्यांचे जीवलग मित्र नामदार दाजी आबाजी खरे हे आहेत. त्यांनीं नामदार टिळकावर वृथा लादलेलें राजद्रोहाचें पाप निराकृत करण्यासाठीं विलायतच्या सफरीला गेल्या ३ च्या तारखेला प्रारंभ केला. नामदार खरे ह्मणजे कै० विश्वनाथ नारायण मंडलिक, व महादेव चिमणाजी आपटे यांच्या पश्चात् नामांकित वकिला पैकीं एक आहेत. आपल्या नुकसानीला न जुमानता देशाभिमानानें नामदार खरे विलायतेस गेले आहेत आणि ईश्वरकृपेनें त्यांच्या परिश्रमांचे यश सर्व इंडियनांस आनंदित करील असें आह्मी इच्छितों.

---

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 11, 1897

The prospects of a rich harvest gladden our hearts and we are in a position to congratulate the authorities in Berar upon their successful efforts in facing the worst sort of famine. The human misery consequent upon the famine that will shortly disappear was most intense in depth and universally wide in its range The effects of such calamitous woes are patent and vivid to all minds. Families have been starved to the utmost point of deprivation, and loss of position, wealth, and social greatness. People have learnt the sad lessons of adversity and we do not know how and when these fallen people will attain to their original status and come to enjoy the happy life of good citizens of a rural province. This extreme helplessness of the masses is rather past improvement and we are very sorry for this aspect of the subject. It is not the next harvest that will bring back people to their old days of plenty and happiness. We

would heartily wish for such a time in no distant future but hope belies hope when we sit at the problem with a mind bent upon a happy solution. We look up to the Government with a fervant preyer that the experiences of the last famine should be utilized to improve the general lot of the people. The Govern—ment are rather dull and deaf to a great extent in such matters. This state of things paralyses our high hopes and aspirations. The Government is benign, benevolent, and every thing but fails in removing its *foreign* nature in so far as it deadens the material prosperity of this country. The higher claims of the ruling people have dealt out a deadly blow to our material wealth. India is turned into a civilized nation but there is a qualifying adjunct. She is getting poorer and poorer. This fact appals our sense of obligations to the English nation. The welding process of bringing the Indians under one sceptre of the British nationality has not yet achieved the noble task of fusing together the English and Indian interests into one whole. This drawback of the British rule is brought forth point-blank in all its striking vividity when a famine of one year reduces a vast empire like India to one full of starving people. No doubt the arrangements of the Government have helped many persons to eke out life from the thraldom of dealth but the prostration of the general masses is wide and universal and is practically preparing them for a downward march into unknown depths of poverty. The Indian proverty is then the sum total of the English rule in India. We want to draw the attention of the Government to this particular fact. The English people are righteous and generous and when once this fact becomes a matter of sure conviction with them we hope shall have discharged our work. The ways of improvement will not be far off from measures of practical polities. Berar like other provinces in India will hold forth the same picture of poverty as we have tried to draw of the country in general. The staying power of our Berar people proved to be nil at the last crisis and we hope that the policy of administration will assume a *native* aspect of improving the lot of the people at large.

The vigorous and eloquent defence of the 'Frontier wars' by Sir George White the Commander-in-Chief of India is a memorable one since it gives in clear and definite terms the policy of the Government in these tribal wars. He observed.

"Those who merely accept the fact that we are again engaged in what they call one of our usual frontier wars, without taking the trouble to dig down to the why and the wherefore, are too apt to attribute these wars to mistakes of policy and maladministration of our relations with the tribesmen; and they clamour for wiser heads to direct us. But the history of all times has shown that civilization and barbarism cannot exist conterminuosly and at the same time peaceably as independent neighbours. The savage will not subject himself to the restraining influences which enable communities more advanced in civilisation to live at peace. This is more especially the case amongst our border tribes who pride themselves on their individual liberty, on obeying no order, and on being no man's servants. The younger and turbulent spirits turn a deaf ear to the counsels of the greybeards, and will not restrain their aggressive proclivities in the interests of the tribe at large. The tide, once turned, gathers strength in its flow, and at length carries all before it in its onward course, not even excepting those who in the earlier stages offered wiser counsels, but who now ride on the crest of the fanatical wave to avoid being carried back by it after the ebb and swamped in that ocean of persecution which awaits those who have been lukewarm in the causeo the faith. The quarrels we are now engaged in, and which are costing us untold gold, are none of our seeking but being in them we hope to bear ourselves so that the opposer may beware of us for sometime (Applause) We hear a great deal of abuse of the forward policy, but look back on the history of the world and you will see that by fate's inexorable decree civilisation must advance and savagery must recede. History does indeed present a few lamentable instances in which barbarism has conquered civilisation, but civilisation had become effete, and I hope in this company at all events there is no Englander little enough to wish so terrible a realisation of his theories as regards England's great and beautiful civilising mission in the East. (Applause.) The causes of the advance of civilisation are not far to seek. The pressure of constant watchfulness becomes intolerable when in presence of a people that respect no engagement and may be in friendly intercourse with you in the morning and advancing in thousandss before night armed and prepared to murder and to ravish. This is no fancy picture."

If closer control and disarmament are the Key-notes of the present war-policy we suppose the argument holds good in conquering the whole world. Such is the strong policy of war and one may be surprised to see that within a week of this speech Lord Hamiltou gives upon his responsibility a free hand to the Indian Government and promises to extend Lord Elgin's term of office to secure such an able Viceroy at the helm of Indian affairs.

## देसाई प्रकरण

### ( रा. रा. देवीराम कोंडाजी, हुजूर नाझर यांचा पश्चात्ताप )

रा. रा. व्यंकटराव कृष्ण देसाई वकील अकोले यांसी.

देवीराम कोंडाजी नाझर अकोलें याजकडून फार फार राम राम विनंती विशेष.

रायाजी सोनार याचे प्रकर्णांत मे. अजीजुद्दीन साहेब अ. क. यांजपाशीं खाशीं लिहिलेला मजकूर मी सांगितला तो:—

"माजिस्ट्रेट या नात्यानें मे. आजिजुद्दीन साहेब यांचे विरुद्ध अर्ज देण्यास लोकांस चिथविणें हा मी. व्यंकटराव देसाई याणी आपले धंद्याचा एक भागच केला आहे."

हा मजकूर मी रायाजी सोनार याचेवर चौकशी न करितां भरंवसा ठेवून सांगितला परंतु आतां चौकशी अंतीं असें समजतें कीं, रायाजीचें बोलणें खरें आहे असें वाटत नाहीं ह्मणून झालेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप होऊन मी आपली माफी मागतों व आपण मजवर कोर्टांत इं. पि. कोड कलम ५०० प्रमाणें आणलेली फिर्याद परत घ्यावी व दिवाणी कोर्टांत अब्रुनुकसानीची फिर्याद करूं नये.

अकोलें ता. २७।९।९७. { सही देवीराम कोंडाजी दस्तुर खुद्द.

## वऱ्हाड

वऱ्हाडांत ३० जानेवारी पासून २५ सप्तेंबर पर्यंत एकंदर धान्यें ६७८४१६ मण बाह्य प्रांतातून आलीं आणि वऱ्हाडांतून १६४१०० मण धान्यें बाहेर गेलीं ह्मणजे एकंदरीनें ५१४३१६ मण धान्यें वऱ्हाडांत दुष्काळामुळें आलीं.

खान बहादूर नवाब सलामुल्लाखान आनररी माजिस्टेट्ट वर्ग १, बुलढाणा, यांस क्रिमिनल प्रोसिजरचे २६० कलमांत सांगितलेले समरी माजिस्ट्रटचे अधिकार देण्यांत आले.

वऱ्हाडांतील मुनसिपाल कमिटीच्या हद्दींत पोलीस आक्टाचे ३४ वें कलम लागूं केलें आहे.

वणी जिल्ह्यांतील फारेस्टर पासून सर्व वरील अधिकारी यांस असा अधिकार नवीन देण्यांत आला आहे कीं त्यांच्या जंगलच्या हद्दींत परवान्या वाचून किंवा इतर बेकायदेशीरपणानें हत्यार घेऊन जाणाऱ्यांची हत्यारें त्यांनीं हिसकाऊन घ्यावीत.

रा. रा. सी. के. चतरजी व मनसुखराय एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर वर्ग, ३ यांची वरिष्ठ जागीं बढती झाल्या कारणानें खालील वर्गावर्गी करण्यांत आली:—

| एकस्ट्रा असि. कानसरव्हेटर मि. | बढतीचा वर्ग |
| --- | --- |
| श्रीनिवासलु नायडू | ३ रा. |
| एल. के. मार्टीन | ३ रा. |

मे. एफ. एस. बुलक सी. आय. ई, कमिशनर यांनीं गेल्या २५ वे तारखे पासून वीस दिवसांची हक्काची रजा घेतली आहे.

रा. रा. विठूजी नारायण तहशिलदार वर्ग ३ यांस घरगुती कामा करितां ६ महिन्यांची रजा गेल्या १ ले तारखे पासून देण्यांत आली. त्यांच्या रजेंत मि. रघुपती मोहनराव हे पुसदास तहशिलदारीचें काम करितील. आणि मुर्तीजापूरच्या त्यांच्या तहशिलीवर मि. सोराबजी शापूरजी नायब तहाशिलदार यांस नेमिलें.

भवसागरानंदलहरी नाटककार धुळेकर भडक मंडळीनें परवा रात्रौ 'कामसेनरसिका' या नाटकाचा प्रयोग केला. नाटक चांगलें झालें. सीन वगैरे फार उत्तम होते.

काशीकर ब्रह्मसमाजाचे मिशनरी रा. रा. बलदेव नारायण यांची दोन व्याख्यानें धर्मासंबधानें झालीं. हे या आठवड्यांत उमरावतीस जाणार आहेत.

रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. शिक्षक, हायस्कूल, उमरावती यांस तेथील नायब तहशिलदारीच्या जागीं सध्यां आक्टिंग नेमलें. मुलकी खात्यांत विद्वानांची भरती होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. गोपिनाथ हरि वकील उमरावती यांस अर्धांगवायूच्या विकृतीनें देवाज्ञा झाली.

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर येत्या राष्ट्रीय सभेची मुहूर्तमेढ रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे यांचें हातून पूजाअर्चा वगैरेसह रोवण्यांत आली.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
| --- | --- |
| आळशी | ८८—८९ रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | १३० रु० |
| ,,( बनशी ) | १४५ रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६॥। रु० मण |
| तूप | ८॥ मण |
| मीठ | ३॥।= मण. |
| सोनें | २५ तोळा |
| चांदी | ७२ |

### NOTICE

It is hereby published for the information of the Akola public that copies of the list of voters for ward No. III prepared by the Municipal Secretary under rule 6 of the Berar Municipal Election Rules, are posted, as required by rule 7, at the places mentioned below and that persons entitled to vote in Ward No III under rule 3, are requested to see if their names are included in the lists copies of which are so posted and make complaints, if there be any, under rule 8 before the 1st of November 1897.

Names of places where copies of the lists are posted.

1 The Deputy Commissioner's office.
2 The Tahesildar Cutchery
3 The Chaweries.
4 The Police Station.
5 The Cotton Market.
6 The Weekly Market.
7 ,, Morna bride.
8 ,, Town Hall.
9 ,, Small Cause Court.

Dated Akola 11—10—97. { K. G. Damle] Secretary Municipal Committee Akola

### नोटीस

ह्या नोटिशीनें अकोलें येथील सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं म्युनिसिपल सेक्रेटरीनें निवडणुकीचे ६ वे नियमा प्रमाणें वार्ड नंबर ३ मधील मत देणाऱ्या लोकांची यादी तयार करवून नियम ७ प्रमाणें खाली लिहिलेल्या ठिकाणीं तिच्या नकला लाविल्या आहेत. नियम ६ प्रमाणें ज्यांना वार्ड नंबर ३ मध्यें मत देण्याचा अधिकार आहे त्यांना विनंती करण्यांत येते कीं त्यांनीं आपली नांवें सदर्हू याद्यांत दाखल केलेली आहेत किंवा नाहींत हें पहावें. आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती तारीख १।११।९७ चे आंत करावी.

१ मे. डिपुटीकमिशनर साहेब यांची कचेरी.
२ स्मॉल कॉज कोर्ट
३ तहशील कचेरी.
४ कॉटन मार्केट
५ धान्याचा आठवडे बाजार
६ चावड्या
७ पोलीस स्टेशन्
८ लोखंडी पूल
९ टौनहाल

तारीख ११।१०।९७ K. G. Damle. सेक्रेटरी म्यु० क० अकोला०

## वर्तमानसार.

माकडाची मौज— येथील पोलीस सुपरिं० सा० मि० पेंटन यांचे बंगल्यावर पाळिलेलें एक माकड परवां सायंकाळीं एखादें मनुष्य घरांतून रागावून निघतें त्याप्रमाणें निघून सुभाकचेरी जवळ आलें आणि तेथें जमलेल्या अनाथीं भिकारां पैकीं एका महारिणीचे आंगास लपेटून बसलें. त्याचे मागोमाग बंगल्यावरील लोक पाठलाग करीत आले व त्यास धरण्याचा प्रयत्न करूं लागले; त्यांणीं त्याला मारझोडही केली; परंतु कांहीं केल्या तें त्या महारिणीस ह्मणून सोडीना; तेंव्हां त्या लोकांचा निरुपाय होऊन त्या महारिणीलाच ते बंगल्यावर घेऊन गेले. तिच्या मागोमाग तें माकडही गेलें. तेथें कांहीं खाण्याचे जिन्नस त्याजपुढें टाकून धरण्याचा प्रयत्न पुनः करीत होते परंतु ते सर्व व्यर्थ गेले. त्या महारिणीला तें माकड सोडीना. तेव्हां तिलाच तें बक्षिस दिलें आहे असें सांगून वाटेस लाविली. ती निघाल्या बरोबर तिच्या मागून तेंही सुभाकचेरी पाशीं येऊन तिच्या जवळ बसलें. त्या माकडाला महारिणीनें दूर केलें तरी तें दूर होत नाहीं. व तिला मुळींच विसंवत नाहीं. ती कोठेंही चालली तरी मागोमाग तें माकड आहेच! तिच्या लहानग्या आंगावरील मुलाला तें माकड गोंजारतें व त्याला मांडीवरही घेऊन बसतें ! ! कचेरी जवळ जमलेली शेकडों मंडळी ही मौज पहात होती. कित्येकांनीं कौतुकानें त्या माकडाला पैसा टाकला. याप्रमाणें महारिणीला कांहीं पैसे मिळाले. या अनाथीं महारिणीच्या पोटाची तजवीज परमेश्वरानें ही केली असें दिसतें.

स० शो०

ब्रिटिशराज्याचा विस्तार.

नुकतेंच एका गृहस्थानें ब्रिटिशराज्याच्या विस्तृत क्षेत्रफळाचे आंकडे बऱ्याच काळजीपूर्वक शोध करून काढलें आहेत. त्या सर्वांची एकंदर बेरीज ८४०९७९० चौरस मैल होते. त्याचा तपशील खालीं दिल्याप्रमाणें आहे. युरोपांत ( इंग्लंड स्वतः खेरीज करून ) १२० चौरस मैल; आशिया खंडांत १४१४१३० चौरस मैल; आफ्रिकेंत ३००००० चौरस मैल, अमेरिकेंत ३६१०००० चौरस मैल, व आस्त्रेलेशियांत ३०८५५४० चौरस मैल आहे.

मधमाशांचें विष.

आज पर्यंत अनेक औषधें मनुष्यानें तयार केलीं. परंतु त्यांतील बहुतेक वनस्पतीपासून तयार केलेली आहेत. पण आतां कांहीं लोकांनीं मधमाशीच्या नांगींतील जालीम विष काढून तें] औषधी उपयोगास लाविण्याचा प्रयत्न चालविला आहे. अमेरिकेंतील दोघां गृहस्थांनीं मधमाशांचें विष याप्रमाणें काढण्याचा धंदाच स्थापित केला आहे. हें विष दोन तऱ्हांनीं काढिलें जातें. एक लहान लहान कांचेच्या नळ्यांत त्यांचीं तोंडें घालून मागून पोटें चेपून धरून त्या आपले अंगचें सर्व विष नांगीनें त्या नळ्यांत मारमारून ओतून टाकतील असें करणें व दुसरा मार्ग त्यांस एका बाटलींत धरून त्रासवून त्या बाटलींत घातलेल्या दारूंत त्यांचें विष पडेल असें करणें. हें विष संधिवाताव, सर्पदंशावर व निरनिराळ्या व्रणांवर फारच रामबाण आहे असें ह्मणतात.

तारेचा वेग.

आपण आपल्या स्नेह्यास एखादी ताबडतोबीची तार केल्यास ती त्यास जाऊन पोहोंचेपर्यंत तास दोन तास सहज जातात. परंतु केवळ तारेंतून शब्द जाण्यास किती वेळ लागतो, याची कल्पना फारच थोड्यांस येणार आहे. लंडन येथून अटलांटिक महासागर ओलांडून सुमारें आठ हजार मैलांवर एक तार करून तिला खरोखर प्रवास करण्यास किती वेळ लागतो हें पाहण्यासाठीं प्रयोग केला. त्यावेळीं दोनशें खुणा करून पाहिल्या- तर असें आढळलें कीं दर खुणेस आठ हजार मैल प्रवास करण्यास फक्त एक पूर्णांक एक विसांश सेकंद इतका वेळ लागतो.

क०

बेहेरिंग येथील दर्यावी वांध्यांचा निकाल लावण्याकरतां जें एक कॉन्फरन्स नेमलें आहे त्यांत राशिया व जपान यांस सामील करण्यांत आलें असून इंग्लंडला सामील होण्याचा युनायटेडस्टेट सरकार कित्येक दिवसापासून आग्रह करीत आहे. परंतु लॉर्ड सॅलिसबरी यानीं अमेरिकन सरकारला अशी सूचना केली आहे कीं, सदर्हू वांध्याचा निकाल करण्याकरतां, फक्त इंग्रज, कॅनडीयन व अमेरिकन यांचीच योजना करण्यांत येईल तरच इंग्लंड त्या सभेंत दाखल होईल. पण राशिया व जपान यांचा निविलोफ टापूशीं अर्थाअर्थी संबंध नसतांही जेंव्हां त्यास दाखल करण्यांत आलें आहे तेव्हां इंग्लंड त्या कान्फरन्स मध्यें मुळींच शिरकूं इच्छित नाहीं असें लॉर्ड सॅलिसबरी यांनीं साफ कळविलें आहे.

गु०

फ्रेंच सरकारचे मुसलमान—इंग्रज सरकार आणि सुलतान यांच्या ताब्यांत जे मुसलमान आहेत त्यांच्या खालोखाल मुसलमान फ्रेंच सरकारच्या ताब्यांत आहेत ही गोष्ट पुष्कळांस माहीत नसेल. फ्रेंच सरकारच्या ताब्यांत आलजिरिया येथें ४० लाख मुसलमान आहेत. ट्यूनीस येथें १९ लाख आहेत. सौदन पैकीं जो भाग फेंचाचे ताब्यांत आहे तेथें २० लाख मुसलमान आहेत. हल्लीं हिंदुस्थानच्या सरहद्दींवरील मुसलमान इंग्रज सरकारा विरुद्ध उठले आहेत तेव्हां आपल्या ताब्यांतील मुसलमानही आपल्या विरुद्ध उठतात कीं काय ह्मणून फ्रेंच सरकारास भीति पडली आहे.

मुंबई येथील म्युनिसिपालिटीस मुंबईची नीट चांगली व्यवस्थेशिर रचना व आरोग्य रक्षणाची व्यवस्था लाविण्यास पाच कोटी रुपये मुंबई सरकार काढणार आहेत. दी. बं.

पंजाबसरकार आपल्या इलाख्यातल्या न्यायखात्याच्या व्यवस्थेंत फेरफार करण्याचा विचार करीत आहे. जज्जांच्या मोठाल्या जागा कमी करून लहान पगाराच्या जास्त करीत आहे आणि माजिस्त्रेटचें काम वेळच्यावेळीं होण्याकरतां असि. कॅलेक्टरच्या जागा वाढवीत आहे. यांत खर्चाची रकम न वाढवितां प्राव्हिन्शीयल नोकराची भरती होणार आहे असें सांगतात.

ब्रह्मदेशांत कोणा बारिस्टरास एकाद्या बाहेर प्रांताच्या कोर्टांत काम करावयास जावयाचे असल्यास बसण्यास लागणारी खुर्ची आपल्या बरोबर न्यावी लागते. नाहीं तर नुसत्या जमिनीवर बसावें लागतें असें प्रसिद्ध झालें आहे.

टर्कीच्या सुलतानाच्या दरबारीं असणाऱ्या इंग्रजवकिलानें सुलतानाकडे पुढील प्रमाणें सक्त फिर्याद केली आहे:— कपुरथळयाच्या महाराजाशीं झालेले संभाषण ह्मणून जो एक खोटा लेख साबा पत्रांत प्रसिद्ध झाला आहे त्यास जबाब देण्याची प्रेस अधिकाऱ्यानें सक्त मनाई केली आहे. मुसलमानांच्या धर्मसमजुतींस इंग्रज सरकार योग्य मान देत नसल्यामुळें हिंदुस्थानांतले मुसलमान लोक कलिफास मदत करण्यास तयार झाले आहेत आणि त्यामुळें सरहद्दीवरचा बखेडा माजला आहे असें कपुरथळयाच्या महाराजानें बोलून दाखविल्याचें जें त्यांत ह्मटलें आहे तें अगदींच खोटें आहे.

सरहद्दीवर जास्त लढाया होण्याचा रंग दिसत असून त्या करितां घोडेस्वार पलटणी अधिक पाहिजे आहेत असें सांगतात.

बल्लारी जिल्ह्यांत कुडलिगी येथे तीन दिवसांत १० इंच पाऊस पडला. तळीं व नद्यांस पूर येऊन ५ दिवस डाक बंद होती.

फ्रान्स, अमेरिका व राशिया यांचें ऐक्य असावें अशा मताचा एक प्रसिद्ध गृहस्थ फ्रान्स मधील एका पत्रांत लिहितो कीं, आतां अमेरिका आपल्या बखुती कटकटींतून सुटली असल्यामुळें ती आतां जगाच्या राज्य कारस्थानांत शिरूं लागली आहे. संरक्षण हाच ज्यांचा धर्म अशा मताचें हे तिन्ही राजे आहेत. तिन्ही राष्ट्रांचे हित एकच आहे व त्यांच्यांत आपसांत मुळींच लढा नाहीं या सर्वांचा एकच शत्रू—इंग्लंड—आहे. अमेरिकेच्या सरहद्दीवरच इंग्लंड आहे, स्टेट्स, बालकन, अफगाणिस्थान व हिंदुस्थान या ठिकाणीं राशिया त्यांचा समाचार घेईल आणि फ्रान्सला इंग्लंड प्रत्येक ठिकाणीं दृगोचर आहे. फ्रान्स व राशिया यांचा शत्रू जपान होय. तसेंच या तिघांच्याही रस्त्यांत एखादेवेळीं चीनही येऊं शकेल. अमेरिकेचें सैन्यबल जरी आकुंचित आहे तरी संपत्ति, उद्योग व योग्यता या गोष्टी त्याच्याकडूनच मिळण्याचा संभव आहे, तसेंच प्रसंगीं मदत आरमारही ती देऊं शकेल. पण या कटामुळें अमेरिकेचा काय फायदा होईल हें मात्र निश्चयानें सांगता येणार नाहीं. दुसरा एक पत्रकर्ता ह्मणतो कीं, बेलजम व इंग्लंड यांच्यांत स्वरक्षणाचा तह होण्याचे घाटत आहे.

अ.

रोगानें मेलेलीं गुरें जाळण्याची इशारत— मि. विलि नामक फ्रेंच शोधकांनीं “ जर्नल आफ फ्रांकलीन इन्स्टिट्युट ” मध्यें स्वानुभवावरून असें लिहिलें आहे कीं, मुसळवाद; ताप इ० रोगांनीं मेलेलीं गुरें ज्या ठिकाणीं पुरलीं असतात त्या ठिकाणीं त्या रोगाचे किडे फार काळ पर्यंत जिवंत राहतात, आणि त्या जागीं चरणाऱ्या इतर गुरांचा वाखा होऊन तीं मरण्याचा फार संभव असतो. यास्तव धामीनें मरणारी गुरें पुरण्यापेक्षां जाळणें चांगलें.

निझाम प्रॉमिसरी नोटा—या नोटा निजाम सरकारांनीं काढल्या असून त्याबद्दल ह्मणजे त्या घेऊन कर्जाऊ रुपये देणारास शेंकडा ६ रुपये प्रमाणें व्याज दिलें जाणार असल्याबद्दल निझाम सरकारच्या जाहीरींत प्रसिद्ध झालें आहे.

वेषधारी—काशी येथें राहणारा नातू या नांवाचा मनुष्य कित्येक वर्षें नाहींसा झाला होता. एक दिवशीं गंगेंत स्नान करतां नातूसारखा मनुष्य कित्येकांनीं पाहिला त्याच्या आईस आणि बायकोस हकीकत कळल्यावरून त्या त्याच्याजवळ गेल्या आणि त्यास घरीं चलावयास आग्रह करूं लागल्या प्रथमतः मी येणार नाहीं ह्मणून त्यानें आग्रह धरिला. कारण, गृहस्थाश्रमापेक्षां ही साधुवृत्ति मला जास्ती पसंत आहे ह्मणून तो ह्मणाला. परंतु फारच आग्रह केल्यावरून तो गेला आणि संसारसुख भोगूं लागला. कांहीं दिवसांनीं बायकोस घेऊन गेला. पुढें खरा नातू घरीं येऊन तपास करूं लागला तों बायको गेली. पोलीस वेषधारी नातूचा तपास करीत आहे, ह्मणून बनारस वैभवावरून समजतें.

अलावन्स बंद—हल्लीं हिंदुस्थानच्या खजिन्यावर लढाईच्या जबरदस्त खर्चाचें फारच आकर्षण लागल्यामुळें नाम० गव्हर्नर जनरल; मुंबई व मद्रासचे गव्हर्नर व त्यांचे कौन्सलर तसेंच बंगाल, पंजाब, ब्रह्मदेश वगैरे प्रांताचे ले० गव्हर्नर आणि ख्रिस्ती धर्माचें बिशप यांस कांपनसेशन अलावन्स देऊं नये असें सरकारानें ठरविलें असून हायकोर्ट जज्जांसही तें देऊं नये असा विचार चालू असल्याचें सिमल्याची तार सांगते.

हिंदुस्थानांत मुल्ला कसे आले—प्रतापगंजच्या बाजारांत काबुलांतील दोन मुल्ला आले असून ते इंग्लिशा विरुद्ध लोकांत बेदिली उत्पन्न करणारी भाषणें तेथें करीत आहेत; सबब त्यांना पोलिसानें पकडावें असें टा. आ. इं. नें लिहिलें आहे. पोलिसची नजर चुकवून हे मुल्ला आफगाणिस्थानांतून खालीं आलें तरी कसें ? पोलिसानें खबरदारी घेणें अगदीं जरूर आहे.

फोनोग्राफची साक्ष–दूरध्वनि यंत्राची माहिती पुष्कळांस झालीच आहे. ह्या यंत्राच्या साक्षीवर अमेरिकेंतील कोर्टांत आतां निवाडे होऊं लागले आहेत. थोड्या दिवसांपूर्वीं न्यूयार्क येथील एका रेलवे कंपनीवर एकानें गाडींच्या किंकाळ्यांनीं त्रास झाल्याबद्दल नुकसानीचा दावा लाविला होता. त्या कज्यांत रुपयाचे सोळा साक्षी आणण्याच्या भानगडींत फिर्यादी न पडतां दोन फोनोग्राफ यंत्रेंच त्यानें कोर्टांत साक्षी साठीं आणून मांडली. ह्या यंत्रांत आगगाडीच्या किंकाळ्याचा अवाज धरून ठविला होता. तो सोडतांच कोठचें काय आन कोठचें काय ? कोर्टांत एकच कलकलाट होऊन बॅरिस्टरांचीं तोंडें व त्यांचे चाललेले फीचे सट्टे वगैरे सर्व बंद पडले ! जिवंत साक्षींनीं काम होणार नाहीं असें चोख काम ह्या दोन यांत्रिक साक्षींनीं करून कोर्टाची बालंबाल खात्री झाल्यामुळें कोर्टानें निवाडा देवविला ! ! !

स. शो.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत. रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 ............... 8 as

Single copy .................................. 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Peline······3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXI — AKOLA MONDAY 18 OCTOBER 1897 — NO 41

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख १८ माहे आक्टोबर सन १८९७ इ० — अंक ४१

HYDERABAD RESIDENCY,
*the 15th September* 1897.

| | |
|---|---|
| Amraoti Town | Akot |
| Amraoti camp | Basim |
| Karinja | Buldana |
| Akola | Ellichpur City |
| Khamgaon | Ellichpur Civil Station |
| Shegaon | |
| Yeotmal | |

The following revised Rules under section 34 (1) of the Berar Municipal Law, 1886, made at a special meeting by the Municipal Committees noted in the margin, are published for general information.

( By order )
ARTHUR F. PINHEY,
*Secretary for Berar.*

### A.

*Time and place of meeting.*

An ordinary meeting of the Committee shall be held on the 2nd Monday in each month, provided that if that day is for any reason deemed inconvenient, the Chairman, or in his absence the Vice—Chairman, may fix another day.

2. A special meeting of the Committee shall be held annually in the month of October as prescribed in rule 12 of the rules published in Residency Orders Notification No. 278, dated the 22nd August 1896, and confirmed in Residency Orders Notification No. 106, dated the 29th March 1897, in connection with the preparation of the budget estimates.

3. All meetings, both ordinary and special, including those convened under section 27 (2) of the Berar Municipal Law, shall be held at the Municipal Office, or at such place as the Chairman, or in his absence the Vice—Chairman, may determine.

### B.

*The manner of convening ordinary and special meetings and of giving notice thereof.*

4. Notice of every meeting, with a list of the business to be transacted thereat, shall be issued by the Secretary to each member of the Committee. Not less than 72 hours' notice shall ordinarily be given in the case of meetings under rules 1 and 2, and not less than 24 hours' notice in the case of meetings convened under section 27 (2) of the Berar Municipal Law.

5. Every such notice shall state the place, the day, and the hour of the proposed meeting.

6. When issuing such a notice the Secretary shall intimate to the members of the Committee that all correspondence relative to the business to be transacted at the ensuing meeting can be inspected at the Municipal Office.

### C.

*The quorum necessary for the transaction of business at ordinary meetings.*

7. Save as provided in the proviso to section 29 (2) of the Berar Municipal Law, no business shall be transacted at an ordinary meeting unless a quorum is present A quorum shall consist of not less than one—third of the members of the Committee. The name of every member present shall be recorded in the minutes of the meeting.

### D.

*Conduct of proceedings at meetings and adjournment of meetings*

8. Every meeting shall be open to the public, unless at any meeting the Chairman, at the request of the majority of the Committee present, order otherwise.

9 The Chairman of the meeting shall regulate the course of all business for transaction at that meeting and shall preserve order. His decision on questions of procedure shall be final.

10 Any member wishing to bring any proposition before the Committee may give written intimation to the Secretary of his intention to do so and of the terms thereof, and such proposition shall be included in the next list prepared under rule 4 after receipt of the intimation.

11 No matter which is not contained in the list of business shall be brought forward for discussion at any meeting unless with the consent of the Chairman and the majority of the Committee present.

11-a. All questions on municipal matters may be discussed at the meeting of the Committee, provided that they have been brought forward in accordance with the conditions prescribed in rule 10

12 Every proposition and amendment must be proposed by one member and seconded by another, and until so recorded no proposition shall be discussed.

13 After a proposition has been moved and seconded an amendment may be moved at any time.

14 Every proposition and amendment, duly proposed and seconded and in order, shall be forthwith reduced to writing, and shall be recorded in the minutes of the proceedings with the names of the proposer and seconder.

15 When a proposition or amendment has been duly proposed and seconded and reduced to writing, the members present shall be entitled to discuss the same.

Provided that no member present shall speak more than once on any proposition or amendment thereof until all the other members present desirous of so doing have spoken, unless specially allowed by the Chairman. The originator of a proposition shall be deemed to be the person entitled to reply.

16 When an amendment has been brought to any proposition, the amendment shall be put to the vote first. If it is carried, it shall become a substantive proposition, and shall be put to vote as such. If it is not carried, the original proposition shall be put to vote. When there are more amendments than one, they shall be put in the inverse order to that in which they were proposed.

17 Every question shall be decided by a majority of the votes of the members present and voting on that question. In case of an equal division, the Chairman shall have a second or casting vote. Voting by proxy is prohibited. Any member may decline to vote on any subject without assigning his reason for abstaining from voting. Voting shall ordinarily be by show of hands, but the Chairman may, on the requisition of two members, direct that the votes be taken by the Secretary calling the roll, and each member as named intimating his vote to the Chairman.

18. When a motion or amendment has been put from the chair, and been declared by the Chairman to be duly carried, no further proposals for amending the motion or amendment can be entertained.

19. The result of every discussion, with the number of the voters for and against each motion or amendment, shall be recorded in the minutes of the meeting. The names of the voters shall also be so recorded, if votes have been taken by calling the roll

20. Every member shall be at liberty to call the attention of the Chairman to a point of order, even when a member is speaking. On a point of order being raised, the member addressing the meeting shall resume his seat until the question has been decided by the Chairman and no discussion shall be permitted on a point of order, unless the Chairman should think fit to take the sense of the meeting thereon. The Chairman alone shall decide points of order, and his decision is final.

21. It shall be the duty of the Chairman to preserve order and to decide any questions of procedure which may be raised and are not especially provided for in these rules. His decision on such questions is final.

22. Unless with the recorded consent of not less than three—fourths of the members of the whole Committee, no subject once finally disposed of can be reconsidered within six months.

23 All proceedings shall be recorded in English, The matter under discussion before each Committee shall be carefully explained in the vernacular to those members who do not know English before votes are taken.

The record of the proceedings at any meeting shall, when practicable, be completed and read to and confirmed by the members present before dispersing, and the Chairman and Secretary shall sign such record and certify that it has been so read and confirmed

23-*a* A Marathi translation of the proceedings shall be placed on the Municipal Office table for the benefit of Marathi—speaking members, and a Marathi copy of the proceedings will be published in any local newspaper which is willing to publish it without charge:

Provided that the record of proceedings from which the public have been excluded under rule 8 shall not be communicated to any newspaper without the consent of the majority of the members present at that meeting

24 The Chairman may, with the consent of meeting, adjourn any meeting from time to time, but no business shall be transacted at an adjourned meeting other than the business left unfinished at the meeting from which the adjournment took place, unless a separate notice and a separate list have been issued in respect thereof in compliance with the formalities prescribed by rules 4 and 5.

### E.

Division of duties among the members of the Committee.

25 There shall ordinarily be three sub-Committees, of finance, of public works, and of public health—with, if necessary, a fourth for education or other miscellaneous matters.

Provided that if any Municipality so prefers, it may have one sub-committee called the "managing committee," which shall be entrusted with all the executive work of the several sub-committees.

26 Where the Municipal Committee consists of 24 mumbers, each sub-committee shall consist of 8 mumbers and where the Municipal Committee consists of less than 24 members, each sub-committee shall consist of 4 persons.

27 Each sub-committee shall meet as often as necessary for the disposal of business, but not less than once a fortnight,

28 One of the members of each ward shall, if possible, be a member of each sub-committee.

29 Any member of the Committee may be a member of one or more sub committees

30 The members of the several sub-committees shall be appointed by the general committee at a meeting to be held in the month of April in each year.

31. The term of office of a member of a sub-committee shall expire (a) on the appointment of fresh sub-committees in the month of April following; (b) on his ceasing to be a member of the general committee, (c) on the dissolution of the sub-committee. In case (b) the vacancy on the sub-committee shall be filled by the general committee as soon as may be.

32. (1) If the Chairman (or Vice-Chairman) of the general committee be a member of the sub-committee, he shall also be its Chairman. Otherwise the sub-committee shall elect one of its members to be Chairman.

(2) If when any meeting is held the office of Chairman is vacant or the Chairman is absent, the members present shall elect one of their members to be Chairman of the meeting.

33. The sub-committees shall conduct their proceedings according to the Municipal Law and the rules framed thereunder so far as they are applicable.

34. The quorum of each sub committee shall be three members.

35. (1) Every question at a meeting of a sub-committee shall be determined by vote as in the case of a general committee, and the proceedings recorded as in the case of a general committee.

36. Minutes of the proceedings of every meeting shall be drawn up and fairly entered in a book kept for that purpose, and shall be signed by the Chairman of the same or the next ensuing meeting.

37. The secretary to the general committee shall also be Secretary to the sub-committees, and shall attend their meetings.

38. The proceedings of all sub-committees shall be subject to the sanction and control of the general committee, who may at any time, on the application of any person or without such application, rescind or modify any order of a sub-committee.

39. The Secretary will be the chief responsible executive officer of the committee.

It will be his duty to carry out every order or resolution of the committee and of the sub-committees.

40. The sub-committees will be entrusted with the performance of all executive duties in connection with the following subject:—

(1) The finance sub-committee with the following subjects and every other business falling under sections 55, 56, 57, 58, 59, 60, 63, 82 (1), 95, 96, 117 of the law, and rules 36, 41, 44, 45:—

(a) The assessment of taxes.

(b) The collection of all municipal taxes and dues, and the proper keeping of accounts.

(c) If specially empowered by the general cammittee in this behalf, the farming of weekly bazar cess, nakas, slaughter—houses, refuse, mango trees, &c., &c, the terms arrived at being subject to con—firmation by the committee.

[2] The public works sub—committee with the following subjects and every other business falling under sections 79, 95, and 117 of the law as far as applicable:-

[a] The construction, maintenance, improvement, and repair of public streets, bridges, drains, latrines, municipal buildings, and digging of night—soil trenches.

(b) Planting and preservation of trees and superintendence of the municipal gardens.

(c) Management of the water—works.

(d) Repairs to carts, dust—bins, plant, tools, and all other municipal property.

(3) The sub—committee of public health with the following subjects and every other business falling under sections 80, 81, 83, 84, 85, 86, (2), 87, 88, 93, 94, 97 to 110 inclusive, 112, 113, and 117 of the law as far as applicable.—

*a* The conservancy of the muni cipality.

*b* Watering and lighting of roads.

*c* Prevention of encroachments.

*d* Supervision of the night—soil trenches.

*e* Preliminary enquiries into applications for sites.

*f* Supervision of public wells, springs, tanks, and other sources from which water is or may be available for public use.

*g* Supervision of serias, of burial-grounds, and of slaughter—houses.

*h* Rigistration of vital statistics.

*i* Supervision of cattle pounds.

*j* Supervision of municipal dis—pensaries.

*k* Superintendence of vaccina—tion.

*l* Superintendence of the markets except those markets (cotton and grain markets) which have special committees and rules of their own, and with power under section 97 and 117 as far as applicable.

*m.* And generally the prevention of all nuisances.

F.

*Persons by whom receipts may be granted on behalf of the Municipal Committee for money paid*

41. All receipts for money paid under the Berar Municipal Law shall be granted by the Chairman, the Vice—Chairman, or the Secretary in charge of the office work for the time being.

G.

*miscellaneous.*

42. The power of entering on behalf of the committee into any contract falling under sub—section 1 of 30 of the law is hereby delegated to the Chairman of the sub—committee to which the work under contract belongs and the Secretary in charge of the office.

43. The appointment, punishment and dismissal of all petty establishments will be in the hands of the finance sub—committee, subject to the general control of the general committee.

The appointment, punishment, and disminal of servants in superior service shall rest with the general committee.

Provided that when dealing with the dismissal of these men the procedure applicable to the dismissal of Government servants under standing orders shall be observed.

Provided further that the Chairman, or in his absence the Vice—Chairman, is authorized to suspend any servant of the committee for sufficient cause and to appoint a successor subject to confirmation by the committee.

44. Casual leave not exceeding three days may be granted to any servant of the municipality by the Chairman, the Vice—Chairman, or the Secretary. Leave exceeding this period may be granted by the general committee.

45. The Chairman, or in his absence the Viee—Chairman, is authorized to sanction expenditure for emergent and miscellaneous works up to Rs. 50.

Note—In rules 8, 11, 15, 17, 18. 20 and 21 the word "Chairman" means "the Chairman of the meeting"

## वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन कृष्ण ८ शके १८१९

दिवाणी व फौजदारी प्रकरणाच्या नक्कला संबंधानें मे. आबर्ड साहेब यांनीं नवीन नियम केले आणि ते वरिष्ठ सरकारच्या मंजूरातीनें अंमलांत आले आहेत. त्या नियमांतील महत्वाची माहिती आह्मी सर्व लोकांच्या उपयोगा साठीं खाली देतों. नक्कलनवीसांचें खातें नवीन पायावर रचलें आहे.

जुडिशिल कमिशनरचें कोर्ट, सेशन कोर्ट, आणि जिल्ह्या जिल्ह्याचीं कोर्टे यांच्या हल्लींच्या व्यवस्थे प्रमाणेंच नक्कलनवीसांचें खातें कायम ठेविलें आहे. परंतु त्यांत इंग्रजी व मराठी अशा दोन बाजू निरनिराळ्या केल्या असून नक्कलनवीसांचे पगार ३५ रुपयां पासून ७ रुपया पर्यंत निरनिराळे मुक्रर केले आहेत. एकंदर इंग्रजीकडे ९० नक्कलनवीस व मराठीकडे ६४ नक्कलनवीस ठेविले असून त्यांचा सालिना पगार १८२१६ रुपये होतो. ही नक्कलनवीसांची संख्या ठरवितांना साधारण अनुमान असें धरलें आहे कीं प्रत्येक नक्कलनवीस दर दिवशीं निदान इंग्रजी किंवा मराठी १९०० शद्बांची नक्कल करितो. वरील संख्येंत कांहीं फेरबदल करणें झाल्यास किंवा नवीन नक्कलनवीस ठेवणें असल्यास त्या गोष्टीला आलिशान रेसिडेंट साहेबांची मंजुरात पाहिजे. या खात्याची व्यवस्था व देखरेख प्रस्तुत प्रमाणेंच चालेल पण ती जरा कडक रितीची केली आहे.

नक्कलेच्या खर्चाची आकारणी आजपर्यंत अंदाजानें होत असे. हा अंदाज नेहमीच्या वहिवाटीमुळें बहुतकरून बरोबर होत असे आणि अंदाजानें ठरविलेली रक्कम एक वेळ भरली ह्मणजे त्या रकमे संबंधानें पुढें कांहीं भानगड राहत नव्हती. पण नवीन व्यवस्थे प्रमाणें अगोदर अंदाजानें नक्कलेची फी घेतली जाईल परंतु नक्कल तयार झाल्यावर जी खरी किंमत ठरेल ती पुरी करून घेण्यांत येईल आणि जर नक्की किंमती पेक्षां आगाऊ अधिक रक्कम वसूल झाली असेल तर ती परत करण्यांत येईल. या नवीन व्यवस्थे प्रमाणें नक्कले साठीं कोर्ट फीचे चार आण्याचे व आठ आण्याचे असे दोन प्रकारचेच स्टांप कागद ठेविले आहेत. साध्या नक्कलेसाठीं चार आण्याचे स्टांप उपयोगांत येतील आणि जरूरीच्या कामासाठीं दुप्पट फीच्या नक्कलेसाठीं आठ आठ आण्यांचा कागद घेण्यांत येईल. प्रत्येक नक्कलेच्या कागदाच्या मुखपृष्ठावर १० ओळी व पाठीवर २० ओळी अशा ओळी लिहिल्या पाहिजेत. अशा प्रत्येक ओळींत अंदाजानें इंग्रजी शद्ब ९ किंवा ७ मराठी शद्ब लिहिले जावेत. ओळींतील शद्बाच्या संख्येंत बदल झाला तरी प्रत्येक कागदाच्या दोन्ही बाजू मिळून इंग्रजी १५० किंवा मराठी २१० शद्बापेक्षां जास्त शद्ब नसले पाहिजेत; आणि अशा लिहिलेल्या इंग्रजी १५० किंवा मराठी २१० शद्बांस चार आणे प्रमाणें फीची आकारणी पडेल व जरूरीच्या नक्कलेसाठी ८ आणे पडतील. हुकूमनाम्याच्या नक्कलेसाठीं स्वतंत्र नमुन्याचे कागद काढले आहेत. यांत अव्वल कोर्टीच्या हुकूमनाम्याच्या नक्कलेला ८ आणे व अपिलेट कोर्टीच्या नक्कलेला १ रुपया या प्रमाणें फी घेतली जाईल. पण एखादा हुकूमनामा या छापील नमुन्यांत बसणार नाहीं तर त्याच्या नक्कलेला सामान्य दरा प्रमाणें आकार पडेल. हे फीचे नियम जी नक्कल कायद्यानें फुकट दिली पाहिजे तिला लागू नाहींत आणि अशी नक्कल साध्याच कागदावर करण्यांत येईल.

नक्कले साठीं द्यावयाचा अर्ज नमुन्याबरहुकूम केला पाहिजे आणि असे अर्जाचे कागद फुकट देण्यांत येतील. ज्याचा त्यानें खुद्द अर्ज करावा किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारा मार्फत करावा. तुरुंगांतील कैद्यानें तुरुंगाच्या सुपरिन्टेंडेंटच्या मार्फतीनें किंवा आपल्या स्नेह्याच्या मार्फतीनें अर्ज करावा. एखादा अर्ज नामंजूर करणें झाल्यास त्या अर्जावर नामंजुरीचा शेरा डिपुटी कमिशनरचा, किंवा कोर्टीच्या आफिसरांचा असला पाहिजे.

अर्जदारांस नक्कला देण्याचा दिवस ७ दिवसां पेक्षां जास्त मुदतीचा नसावा पण नक्कला मुदतींत तयार झाल्या नाहींत तर सात सात दिवसां पेक्षां जास्त मुदत वाढवूं नये आणि प्रत्येक खेपेस वाढविलेली मुदत नोंदण्यांत यावी. जरूरयातीची दुप्पट फीची नक्कल दोन प्रहरा पूर्वीं अर्ज असल्यास त्याच दिवशीं होतां होईल तितक्या व्यव-

स्थनें देण्यांत येईल आणि दोन प्रहरानंतरचा अर्ज असल्यास नक्कल दुसरे दिवशीं दोन प्रहरच्या पूर्वी देण्यांत येईल.

नक्कलनवीसांच्या कचेरीच्या बाहेरच्या बाजूला एका फळ्यावर अर्जदारास देण्या साठीं तयार असलेल्या नक्कलांची यादी दर आठवड्यास लावण्यांत येईल. अशी चार आठवडे जाहिरात राहिल्या नंतर 'बी' संज्ञेच्या फायलांत नक्कल ठेविली जाईल आणि ती अर्जदारानें निराळा अर्ज करून मागून घेतली नाहीं तर तिचा नाश करण्यांत येईल.

---

राष्ट्रीय सभेची तयारी फार नामी चालली आहे. प्रस्तुतच्या स्थितीवरून आह्मी एकें आश्वासन देतों कीं यंदाचा समारंभ सालाबाद प्रमाणें भव्य, टोलेजंग व रमणीय होईल. गेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर उमरावतीस सभामंडप, बराकी, वगैरे कामास सुरुवात झाली. हीं सर्व कामें कंत्राटानें दिला आहेत तथापि त्यांच्या नीटनेटकेपणाबद्दल व उत्तमपणा बद्दल मंडळीची देखरेख लागली असून कंत्राटदार गृहस्थ देखील लाभाकडे विशेष दृष्टी न देतां कामाच्या सुबकपणाकडे अधीक लक्ष पुरवितात. सर्व कामांची रचना अल्हाबादच्या समारंभाच्या धर्तीवर केली आहे प्रतिनिधींच्या राहण्याच्या सोयी, खाण्यापिण्याचा बात बेत इत्यादि गोष्टी सभास्थळाच्या व्यवस्थे बरोबरच मोठ्या कसोशीनें व चौकसपणानें चालू आहेत.

राष्ट्रीय सभेचें प्रचंड कार्य वऱ्हाडच्या मंडळीनें आपल्या अंगावर घेतलें तेव्हां पासून आमच्या प्रांतस्थ लोकाप्रमाणें सर्वत्रांस मोठी काळजी पडली होती. पण सत्कार्याचा महिमा मोठा विचित्र असतो. राष्ट्रसेवे विषयीं सर्व प्रांतभर विलक्षण ईर्षा उत्पन्न झाली आणि राष्ट्रीय सभेची चळवळ हळू हळू सर्व स्थितींतल्या लोकापर्यंत वाढत चालली. या कार्यांत परिश्रम करणाऱ्या सद्गृहस्थांचें वर्तुळ उत्तरोत्तर वृद्धिंगत होत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. प्रारंभीं जानेवारी व फेब्रुवारी असे दोन महिने सर्व कारभार मोठा सतेज होता पण दुष्काळामुळें सर्वजणाचे हात पाय गळाले आणि बहुतेक व्यापार बंद पडल्या सारखे झाले. नंतर पांच महिने पर्यंत सगळी कार्यमाला मनोराज्याच्या प्रदेशांतच होती. मार्ग कुठल्या प्रमाणें झाले. परंतु ईश्वरकृपेनें पावसाळा बरा झाला आणि धान्यसमृद्धीचीं चिन्हें दिसूं लागलीं त्या बरोबर स्वागत कमिटी नेमण्यांत आली आणि तिचे अध्यक्ष रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या विचारा प्रमाणें सर्व प्रमुख मंडळी राष्ट्रीय सभेचा फंड गोळा करण्याच्या कामाला लागली. पूर्व वऱ्हाडाचा भाग उमरावतीकरांकडे सोपविला आणि पश्चिम वऱ्हाडचा भाग अकोलेकराकडे देण्यांत आला. यंदा वर्गणी बद्दल लोकांवर तगादा किंवा सक्ती करितां येत नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेच्या फंडाला लोक वर्गणी गोडीगुलाबीनें देतात. वर्गणी कोणी किती द्यावी या विषयीं कांहीं नियम ठरवितां आला नाहीं; पण ज्याची त्याची शक्ति व इच्छा या दोन गोष्टी वर्गणी जमवितांना मुख्य मानल्या आहेत. वर्गणीचें महत्व व तिचा उपयोग कळविल्या नंतर पुष्कळ लोक मनोभावानें पुढें सरसावतात आणि राष्ट्रीय सभे विषयीं आपली आदरबुद्धि व्यक्त करितात. वर्गणी देण्याची गोष्ट निघाली ह्मणजे सहजी मनुष्य विचार करून योग्य शहानिशे नंतर आपली संमती दर्शवितो आणि थैली उघडतो. या गोष्टीचा फायदा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभा आपणा सर्वांची आहे असें लोकांस वाटूं लागतें. वर्गणी जमविण्याचे काम मोठमोठ्या वजनदार, श्रीमान, विद्वान, व अग्रणी लोकांच्या हातीं आहे आणि त्यामुळें तें इतकें सर्वोत्कृष्ठ चाललें आहे कीं सरकारी सारा देखील इतक्या प्रेमळ मनोभावानें दिला जात नसेल.

यंदाच्या राष्ट्रीय सभेला प्रांतोप्रांतीचे प्रतिनिधी पुष्कळ येतील असा अंदाज आहे. तथ्यां राजकीय वातावरणांत जे विलक्षण प्रकार दृष्टीस पडतात त्यांचा लय होण्या साठीं राष्ट्रीय सभेच्या द्वारानें लोकमत जागृतपणानें व जोरदारीनें प्रकाशित झालें पाहिजे. बारा वर्षे सतत चाललेल्या संस्थेवर अप्रत्यक्ष हल्ले अलिकडे करितात त्यांचें निराकरण होण्या साठीं यंदाचा समारंभ मोठा झालाच पाहिजे. सत्यसंकल्पाची कांस जसजशी जोरानें बळकटीनें पकडावी तसतशी यशसंपदा आपल्या सान्निध वास करूं लागते. हा अनुभव इतिहासानें पक्का ठरला आहे तेव्हां यंदा राष्ट्रीय सभा मोठी टोलेजंग भरविण्या वाचून गत्यंतरच नाहीं. वऱ्हाड प्रांत इंडियाच्या मध्यस्थानीं आहे; रेलवच्या सोयी चांगल्या आहेत, आणि हा पहिलाच समारंभ या प्रांतीं आहे ह्मणून स्वाभाविक रितीनेंच राष्ट्रीय सभा अप्रतिम होईल असा रंग दिसतो.

राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान कोणास अर्पण करावें अशा विषयीं त्या उदार परमपूज्य मि. ह्यूम साहेबाकडे प्रश्न विचारला आहे. इंडियांतीलच एका थोर गृहस्थाला या उच्चस्थानीं निवडावें असें ठरलें तर आमच्या मतानें हा मान बहुमतानें मद्रास इलाख्याच्या वांट्याला येईल असें मागील वहिवाटी वरून वाटतें.

मद्रासचे गृहस्थ नामदार शंकर नायर यांस तेराव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडण्या विषयीं पुष्कळ कांग्रेस कमिट्यांच्या सूचना येत आहेत. बहुतकरून हीच निवड अंमलांत येईल.

---

सर जार्ज व्हाईट कमांडर इन चीफ हे विलायतेस पेनशन घेऊन जात आहेत ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी सिमल्यास झाली त्या वेळीं त्यांनीं प्रस्तुतच्या सरहद्दीवरील लढायीचीं कारणें विदित केलीं. त्यांच्या मता प्रमाणें सुधारणा व रानटीपणा यांचें वास्तव्य जवळजवळ होऊं शकत नाहीं. इंडिया सुधारलेला आहे तेव्हां या देशाच्या सरहद्दीवर रानटी मुलूख असणें ही गोष्ट इंडियास घातुक आहे. ह्मणून सरहद्दीवरील रानटी लोकांस हत्याराच्या कायद्यानें निःशस्त्र बनवून त्यांस सुधारणेच्या चक्राखालीं दडपल्यानें ते शांतवृत्ती, कायद्यानें नम्र, व इंग्रजी अंमलाला अनकूल होतील. हा युक्तिवाद इतका चांगला आहे कीं त्याच्या प्रभावानें सर्व पृथ्वीभर स्वराज्य स्थापित करण्याला उत्तम मार्ग निघेल, सुधारणेचा बाहुटा इंग्रज लोक सर्वत्र रोवतात आणि त्या उदार कृती बद्दल त्यांचा लौकिक गावा तितका थोडा होईल. पण या सुधारणेच्या दीक्षेनें प्रारब्ध केलेल्या लढाईचा खर्च इंडियावर लादला जात आहे ह्मणून मोठी हळहळ वाटते.

---

थोर पुरुषाचें हृदय कुसुमापेक्षां मृदु असतें पण प्रसंग विशेषीं वज्रा पेक्षां कठोर होतें. हा नियम नामदार टिळकांस हा लागू पडला. विद्यमान स्थितींत भेटीस गेलेल्या एका बंगाली मित्रास नामदार साहेब ह्मणाले कीं मी निरपराधी आहे, देहदंड भोगण्यास मी समर्थ आहे आणि मला तो भोगलाच पाहिजे; पण बंगालच्या मित्रमंडळींनें मला या संकटवेळीं जी मोठी मदत केली तिला मी पात्र नाहीं तथापि त्यांच्या उपकाराबद्दल मी त्यांचा मोठा ऋणी आहे. खरोखर हे विचार त्या उदार लोकनायकाचें उदात्त वर्तन व वर्णनीय धैर्य दर्शवितात. बारिस्टर देशपांडे व सेटलूर या मंडळींनीं मुंबईस नामदार टिळकांच्या खटल्याची साग्र हकीकत त्या वरील वर्तमानपत्राचे अभिप्रायासह छापण्यास प्रारंभ केला आहे. पुस्तक फार मोठें होणार आहे ह्मणून त्याची किंमत आठ आणे होती ती दहा आणे केली आहे. पुस्तकें लवकरच प्रकाशित होतील. या पुस्तकाचा उपयोग दुहेरी होणार आहे. इंग्लंडांतील लोकमत अनुकूळ होईल आणि पुस्तकाचें उपन्न प्रिव्ही कौंसिलाच्या अपिलाला कामीं पडेल. लोकाश्रया विषयीं निराळी विनंती करण्याचें प्रयोजन आह्मास दिसत नाहीं.

---

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 18, 1897

Sir W. Hunter goes the length of finding a cause for the present unrest in India. He finds fault with the present system of education and adds that the English people are now eating the bitter fruits of their own teaching and will reap hereafter a large and more acrid harvest. These evils effects are attributed to the teaching of history in Indian schools and Colleges. This is too strong a dose for our poor souls. We can hardly read the true import of these *significant* and suggestive words. If the opinion guide the policy of the Indian Government we hope to realize the bitter fruits of a repressive and stringent administration that has left its sure prints on the events of the last twelve months. These thoughts are not however the dictates of the past history either of India or of England. History does more than what the chronicler does. It tries to link together events in a thread of cause and effect. It interprets the past with a view to guide mankind as regards its present and future. History is not however a sure guide. It cannot masterfully collect the current forces that go to mould up events as they occur. Several unknown causes are at work and any foresight must fail because of its inherent imperfections and short—comings. If history is an uncertain and insecure guide for the future we do not know how its teaching to Indian youth engenders the feeling of disaffection, disloyalty and treason to the British throne. When history ascends its primary stage and takes in the help of philosophy we know its does an immense service to humanity. But if this teaching generalizes Grecian and Roman histories and applies the same tests to the history of India or of England we fail to see how it should help to educate the Indians to seek the fall of the British Raj. The Western education has nothing in it that begets the spirit of disowning the British sovereignty over India. India has no doubt a proud past to stand upon and the English nation has given a permanent foundation to that proud past. Rome was not built in a day. So the present Indian empire is not the full and total product of the British civilization. The English people called into existence an empire when there was anarchy and chaos. The British advent is a fortuitous circumstance but it is not on that account that no other combination of favourable circumstances can build an equally admirable empire. The contact with the English people was an ennobling one and we are extremely thankful to the righteous English people. But let us not mystify the matter at issue. The foreward impulses of the day are the outcome of the welding process of the British administration. The hammering process produces this responsive heat and unifies the English and the Indian people into one nationality. It is this effect that we have in view. We do not want to see the last of the Indian empire but we try to make the present time a common platform on which we shall shake hands with the English people in amity and love to the British throne.

---

## वऱ्हाड

हवामान—गेल्या चार दिवसा पासून हिवाळ्यास प्रारंभ झाला. चांगली थंडी पडूं लागली आहे. सध्यां पीकें सुस्थितींत आहेत. एकंदर पाऊस २३ इंच झाला आणि त्या मुळें पाण्याचा पुरवठा फार कमी होईल. हवा स्वच्छ, थंड व आरोग्यकारक आहे.

आज पासून अकोल्यास सेशन कोर्ट भरणार. या सेशनाला मोकद्दमे सहा सात आहेत. एक आठवडाभर सेशन चालून नंतर दिपवाळीच्या सुट्टी मुळें एक आठवडा बंद राहील आणि पुन्हां एक आठवडा ह्मणजे नोवेंबर ६ पर्यंत सेशन कोर्ट आकोल्यासच भरणार आहे.

रावसाहेब देवराव विनायक कांहीं प्रमुख मंडळीसह राष्ट्रीय सभेची वर्गणी जमविण्य साठीं परवां सायंकाळीं खामगांवास गेले. खामगांवकर मंडळी आपला नांवलौकिक गमावणार नाहींत अशी आह्मांस उमेद आहे.

मुंबई इलाख्यांत प्लेग तडाख्यानें फैलावत असल्यामुळें म्याट्रीक्युलेशनची परीक्षा आकोल्यास घेतली जावी अशी सूचना राव बहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर यांनीं मुंबई युनिव्हरसिटीस केली आहे.

रा. रा. सुब्रायलू नायडू एक्स्ट्रा असि कमिशनर यांची बदली मलकापूरास झाल्या मुळें त्यांच्या रजेंत रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर यांस यवतमाळास एक्स्ट्रा असि, कमिशनर नेमिलें आणि त्यांच्या कामिशतरच्या क्लार्क आफ कोर्टाचे जागीं रा. रा. रामराव पतकी यांस बढती दिली.

वैदर्भकर्ते लिहितात कीं:—मे. वार्न हेस्टिंग्ज साहेब रजेवर गेले व त्यांचे कामाचा च्यार्ज मे. हेअर साहेब रविवारीं घेणार. मे. लूकस साहेबांचे कामाचा च्यार्ज मे. हॉर्सबरो साहेब घेणार; व मे. सिमसन साहेब यांस यवतमाळचे आर्कटिंग डेपुटि कमिशनर नेमलें,

---

## वर्तमानसार.

In the Court of the District Magistrate Akola.

Venkatesh Krishna Desai Petitioner

Order

I can not see what supposed or real benefit could accrue to Rayaji by his changing his statement and it is difficult to understand a man changing his statement in this manner and laying himself open to a certain charge of perjury (I say certain as the man his statement concerned is a pleader well versed in law) unless some reasons exist for it. The man personally bears Mr Desai no ill will. It is unlikely that he should have known what defence Mr Desai would advance and still more unlikely that he should have supposed that he would help the case of his servant Sultan who was the complainant in the case pending before Mr Azizuddin by making a false statement against Mr. Desai. The reason assigned by Rayaji himself that the change of statement is due to his defective memory appears to me correct and I cannot holding this opinion grant the sanction applied for.

Application against Rayaji rejected.

(Sd.) F. W. Prideaux

27/9/97 D. M.

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन कृष्ण ३० शके १८१९

गेल्या अंकीं नक्कला संबंधानें जें सरक्युलर निघाले आहे त्याचा सारांश दिला आहे. त्या वरून पाहतां आमच्या मराठि वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेल कीं नवीन व्यवस्थे प्रमाणें नक्कलनवीसास काम फार पडेल तथापि एकंदरीनें मे० आबर्ड साहेब यांनीं नक्कले संबंधाची व्यवस्था मोठी नामी केली आहे. साहेब बहादुराची योजनाशक्ती मोठी अद्भुत आहे आणि ती सामान्य गोष्टी पासून मोठ्या महत्वाच्या गोष्टीपर्यंत सर्वत्र बरोबर लागूं होते. या नवीन नियमा प्रमाणें नक्कलनविसांच्या खात्याची व्यवस्था, देखरेख, कामगिरी वगैरे गोष्टी आरशा प्रमाणें छानदार व चकचकीत ठेविता येतील. मे० आबर्ड साहेब हे वऱ्हाडच्या न्यायखात्याचें मोठें भूषण आहेत आणि त्यांचें प्रत्येक काम मोठ्या चिकित्सकपणानें निर्मळ केलेलें असतें. वऱ्हाडचे न्यायखातें सुधारण्याला साहेब बहादुरांचा उत्तम कारभार कारणीभूत आहे परंतु तो कारभार सर्वोत्कृष्ट करण्यासाठीं त्यांच्या हातीं अधिक अधिकार पाहिजेत. आह्मांस पक्की उमेद आहे कीं या नक्कलनवीस खात्याच्या नवीन नियमांची अंमलवारी अर्जदारांस चांगली सुखावह होईल.

---

राष्ट्रीय सभेला व्यत्यय येईल व पुरस्कर्त्यां मंडळीस मोठा त्रास होईल असा पुष्कळ ठिकाणचा गैरसमज होता, पण वास्तविक प्रकार अगदीं उलट आहे. सरकारची थोरथोर अधिकारी मंडळी सरकारी हुकूमाप्रमाणें राष्ट्रीय सभेंत कांहीं हात घालूं शकत नाहीं हें खरें पण त्यांची त्रयस्थपणाची वृत्ती मोठी अभिनंदनीय आहे. मि० बुलक साहेब कमिशनर व मि० आबर्ड साहेब जुडिशिअल कमिशनर असतांनाच राष्ट्रीय सभा त्यांच्याच नजरे खालीं यशस्वी होईल असा सर्व जणांस भरंवसा आहे. सरकारी मदत नसली तरी प्रांतिक अधिकाऱ्यांकडून अभिनंदनपूर्वक तिचें आदरातिथ्य होईल अशी मनादेवता साक्ष देते. तीन वर्षांपूर्वीं प्रांतिक जाहिरसभा भरली होती त्या वेळीं कर्नेल स्पान्सकी साहेब कमिशनर होते आणि त्यांनीं या सभे विषयीं आपला उत्तम अभिप्राय प्रगट केला. हाच प्रकार राष्ट्रीय सभेविषयीं प्रत्यंतरास येईल असा प्रांतिक समज आहे.

---

नामदार बाळ गंगाधर टिळक यांस राजकीय कैद्या प्रमाणें बंदिवासांत ठेवावें आणि चोर, डांकेखोर, खुनी इत्यादि अधम वृत्तीच्या लोकां सारखा पेहराव नामदारांस देऊं नये किंवा त्या गुन्हेगारा बरोबर नामदारांस सक्तमजूरीला लावूं नये ह्मणून ' बंगाली ' पत्र कर्त्यांनीं चांगली सूचना केली आहे. सरकार तिला मान देईल तर सरकारावर लोक आनंदानें पुष्पवृष्टी करितील पण असा सुयोग येणें देखील मोठें दुर्घटच आहे.

नामदार टिळकांस मदत करण्या साठीं पुष्कळांनीं पुष्कळ प्रयत्न चालविले आहेत. नामदार टिळकांस मदत ह्मणजे व्यक्तिमात्राला मदत नसून राष्ट्रीय हिताच्या गोष्टीला हातभार लावण्या सारखें आहे. बडोद्यास रा. रा. नारायण चिंतामण आठवले यांनीं पुढील मराठी सालाचीं पंचांगें मोठी छानदार काढलीं आहेत. प्रत्येक प्रतीला किंमत दोन पैसे आहे. लोकांचें कार्य भागतें आणि अपरोक्ष एका उत्तम कार्याला मदत होते. या पचांगाला लोक चांगला आश्रय देतील अशी आह्मास आशा आहे.

---

सन १८७९ च्या स्टांप आक्टामध्यें नवीन दुरुस्ती करून १८९७ चा नवा स्टांप आक्ट करण्या विषयीं व्हाईसराय साहेबांच्या कायदे कौंसिलांत नवा मसूदा आला आहे. फेरफार पुष्कळ करण्यांत आले असून कांहीं कांहीं बाबतींत खुलासा स्पष्टतेनें करण्यांत येत आहे, सर जान वुडबर्न यांनीं हा मसूदा सभासदा पुढें ठेवितांना सांगितलें कीं स्टांप आक्टाचा संबंध लोकांच्या नित्य व्यवहारांतील गोष्टीशी पुष्कळ पडतो ह्मणून चालूं कायद्यांतील तत्व कायम ठेऊन कांहीं फेरफार सूचविले आहेत. हे फेरफार तीन प्रकारच्या बाजूनें आहेत. सामान्य लोकांस देखील स्टांप आक्टाचा अर्थ बरोबर कळावा आणि कायदेपंडितास कायद्यांतील दोषांचा फायदा घेता येऊं नये ह्मणून पूर्वींचीं दुर्बोध स्थळें काढून टाकलीं आहेत. कांहीं व्यवहारांत, उदाहरणार्थ, प्रामिझरी नोट लिहून देतांना सरकारी स्टांपाचें नुकसान करून बांडाच्या स्वरूपाचें कागद लिहिण्याचा परिपाठ पडला आहे तर तो बंद करण्या विषयीं नवी दुरुस्ती केली. तिसऱ्या प्रकारची दुरुस्ती लोकांचे व्यवहार स्टांप आक्टाच्या सवलतीनें सुलभ व सोयकर करण्याच्या दिशेनें आहे.

हल्लीं ज्या कागदांस एक आण्याचा स्टांप लागतो त्या संबंधानें अनेक सुधारणा इंग्लंडाच्या आक्टांतील घेतल्या आहेत आणि त्या मुळें एक आण्याचा स्टांप लागणारे दस्तऐवज भारी स्टांपाच्या सदरांत आणिले आहेत अशाच चार पांच प्रकारच्या कागदांत आणखी सुधारणा करण्यांत आल्या. सध्यां हा नवा कायदा मसूद्याच्या स्वरूपाचा आहे तेव्हां तपशीलवार हकीकत मागाहून देण्याचा विचार आहे.

---

क्रिमिनल प्रोसिजर नवीन होत आहे. पूर्वीचा कायदा सर्व दुरुस्त्या सह नवीन कायद्याच्या रुपानें तयार झाला आहे. हल्लींच्या मसुद्यांत ज्या गोष्टी सुधारण्यांत येतील त्या पुष्कळ चांगल्या आहेत. चांगल्या वर्तणुकी बद्दल एखाद्याला जामिन मिळाला नाहीं तर सध्यांच्या कलमा प्रमाणें त्याला तुरुंगांत पाठवितात परंतु या पुढें त्याला तुरुंगांत न पाठवितां त्यांच्यावर कडक देखरेख ठेऊन त्याला मोकळा ठेवण्याची परवानगी माजिस्ट्रेटाला देतां येईल. ही सूचना फार चांगली आहे. दुसरी सुधारणा अशी सुचविण्यांत आली आहे कीं चोरी, अपहार किंवा दोन वर्षां पेक्षां जास्त शिक्षा नसलेला अपराध जर कोणी केला आणि त्याच्या अवान्तर गोष्टी त्यास अनुकूल दिसल्या तर अशा मनुष्यास त्याच्या अपराधा साठीं तुरुगांत न पाठवितां कांहीं कडक अटीवर त्यास मोकळें ठेवण्याचा अधिकार माजिस्ट्रटांस दिला आहे. अनेक प्रसंगीं असें निदर्शनास येतें कीं एक वेळ अपराध्यांत सांपडलेला मनुष्य क्षमेनें व दयेनें चांगला भला माणूस होण्याचा संभव असतो परंतु तो तुरुंगांत गेल्यामुळें वाईट लोकांच्या संगतीनें अगदीं बिघडून जातो व त्याच्या सुधारण्याची आशाच निर्मूल होते. पश्चात्तापानें शुद्धी येण्याची उत्तम संधी शिक्षेमुळें नाहींशी होती. आणि त्यामुळें कित्येक मनुष्यांची जन्माची हानी होतें. हा अनिष्ट परिणाम टाळण्या साठीं नवीन युक्ती योजना या मसूद्यांत केली आहे. इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत ही युक्ती चागली सफळ झाली. युक्ती एवढीच कीं नव्या अपराध्यानीं असा करार करावा कीं त्याला सरकार बोलावतील तेंव्हां त्यानें हजर होऊन आपल्या वर्तणुकीचा बरोबर हिशोब द्यावा, चांगलें वर्तन ठेवावें व शांतता राखावी. ही सूचना फार महत्वाची आहे आणि तिच्या संबंधानें विशेष तपशीलवार, माहिती आह्मी प्रसिद्ध करणार आहों.

सगळ्या क्रिमिनल प्रोसिजराच्या चांगुलपणाला हरताळ लावणारा व न्यायाला तिलांजली देणारा भाग ह्मणजे ज्या भागांत युरोपियन व अमेरिकन अपराध्यांच्या चौकशी संबंधानें नेटीव न्यायाधीशांचे अधिकार कमी केले आहेत आणि गोऱ्या लोकांस जुरीचे वगैरे अधीक हक्क दिले आहेत तो भाग होय. जर युरोपिअनांस न्याय नेटिवांच्या हातून बरोबर मिळणार नाहीं अशी शंका आहे तर नामदार बाळ गंगाधर टिळका सारख्या गृहस्थां वरील खटल्यांच्या वेळीं यूरोपिअन न्यायाधीशा संबंधानें लोकांच्या मनांतील दहशत निराधार होती असें आह्मास ह्मणवत नाहीं. स्वधर्मी व स्वजातीय लोकांच्या जूरीपुढें न्याय मागण्याचा अधिकार यूरोपियन अपराध्यास आहे तर नामदार टिळकास निदान भिन्नधर्मी पण स्वदेशी जूरीचा फायदा देण्याला कां हरकत असावी हें आमच्या साध्या मनाला कळत नाहीं. कायद्याच्या दृष्टीनें राजा व रंक समसमान पाहिजेत आणि न्यायासना समोर कोणत्याही अपराध्याचे हक्क एकसारखेच असले पाहिजेत. व्यक्तिपात्राच्या विशेषावर ज्या कायद्यांत न्याय देण्याची रीत बदलेत तो कायदा न्याय देण्यासाठीं नसून अन्याय करण्यासाठीं व प्रजेचा छळ करण्यासाठीं, आहे असें आह्मी समजतों.

---

मुंबई पुण्याकडे प्लेगच्या आजारानें कहर उसळून दिला आहे इतकेंच नाहीं तर त्याचा राक्षसी फैलाव सुरतेला व त्या दिशेला होत चालला आहे. नाशिक व खानदेश या जिल्ह्यात प्लेगचें साम्राज्य होत आहे. पंजाबांत प्लेगचें ठाणें बसण्यास सुरवात झाली. जालंदर जिल्ह्यात २९ वर इसम प्लेगमुळें मृत्युमुखीं पडले. हरद्वाराकडे कांहीं लोक दगावले असेंही कळतें. फार कडक नियम तपासणीचे अमलांत असताना देखील प्लेगचा प्रतिबंध होऊं शकत नाहीं. स्थानिक सरकारें मोठी हवालदील झालीं आहेत. वायव्य प्रांतात मोठी दहशतच पडली आहे. पुण्याच्या दक्षिण भागाला सदर्न मराठा रेलवेच्या लाईनीभर प्लेगच्या प्रसाराच्या धडामोडी जारीनें चालूं आहेत. मद्रासेला प्लेगचें बीज गेलें आहेच. आमचा प्रांत, नागपूर बंगाला रेलवेचा भाग वगैरे मलुखावर ईश्वरी कृपाछत्र आहे ह्मणून प्लेगची स्वारी दुरूनच डोकावित आहे. दुष्काळ, पटकी इत्यादिकांनीं सर्व देश अगदीं बेजार व बेदील होऊन गेला आहे अशा वेळीं प्लेगचा फैलाव होणें मोठें दुश्चिन्ह होय.

प्लेगचा रोग काय आहे हें सर्वांस विदितच आहे. मृत्यूच्या दरबारांतला हा विद्युत्प्रभावी मुख्य प्रधान होय. हा माणसाला आपल्या घरीं आप्तमित्रांत देखील मरूं देत नाहीं. प्लेगचा ताप आला कीं, कासाविशी होऊन मनुष्य मरतो. औषध काहीं नाहीं. बिनतोडीचा मरणाचा हुकूम या रोगाचा आहे. संसर्गानें याची विस्तृती त्वरित होते. पुण्याकडील हकीकती मोठ्या ह्रदयद्रावक आहेत. संसार क्षणभंगुर कसा असतो याची शहानिशा तेव्हांच पटते. प्लेगचा देखावा मोठा भयंकर आहे. घरें ओसाड पडलीं, घरंदाज घराणीं जमीनदोस्त झालीं, आणि इतर विपत्ती असह्य झाल्या. परमेश्वराच्या इच्छेला शरण जावें हेंच मनुष्याच्या हातीं आहे. जें होत आहे तें जगाच्या कल्याणासाठीं होत आहे अशा ईश्वरी नेमानेमावर भरंवसा ठेऊन स्वस्थ बसावें व चमत्कार दिसेल तो पहावा !

---

राष्ट्रीय सभेविषयीं प्रस्तुत चाललेली तयारी मोठी आनंदकारक आहे. परंतु सध्यां

प्लेगमुळें सर्व प्रांतस्थ लोकांच्या जीवाला मोठी काळजी लागला आहे चिंता अशी कीं या प्लेगच्या आजारामुळें राष्ट्रीय सभेला विघ्न येईल अशी भीति उत्पन्न झाली आहे. या राष्ट्रपरिषदेच्या समारंभाविषयीं एक प्रतिकूल चकार निघूं नये म्हणून मन मोठ्या चौकसपणानें खटपट करितें परंतु प्लेगच्या उद्भवामुळें हा समाज न भरण्याविषयीं हुकूम सुटतो कीं काय अशी दहशत आहे. या समारंभाला दोन महिन्यांचा अवकाश आहे तेव्हां परमेश्वर कृपेनें हा रोग नाहींसा झाला तर मोठें नामी होइल. सध्यां मांडव इत्यादि गोष्टी विषयीं खर्च मोठा चालू आहे तेव्हां राष्ट्रीय सभेच्या सर्व प्रांतिक कमिट्यांनीं व वऱ्हाड सरकारानें यंदांच्या बैठकीचा प्रश्न लवकरच विचारांत घ्यावा अशी आमची सविनय सूचना आहे. प्रश्न मोठा बिकट व गूढ आहे. राष्ट्रीय सभे विषयीं जो ठराव करण्यांत येईल तो राष्ट्रीय सामाजिक सभेला सारखाच लागू होईल.

OURSELVES.

We request our subscribers will allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done un-grudingly. As our office will be closed for the holidays there will be no paper issued next week.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 25, 1897

A newly amended and consolidated Criminal Procedure Bill is on the anvil of the Imperial Legislative Council. The bill is no doubt a good improvement on the old law. It was introduced on the 15th last at Simla & will be taken up on the 5th proximo. It has proposed a number of changes to remove ambiguities, to adopt the learned opinions of the honorable judges of the Indian High Courts and to introduce some new phases of criminal law in India. It is rather too early to refer to details of amendments. Those matters will have to go through the searching criticism of a Select Committee. But we wish to indicate the principle that underlies the important changes that are eminently two in number. The first refers to the prevention of offences When persons of irresponsibile character and doubtful and suspicious ways of life are called upon to give security for their good behaviour it has often been a sorry experience that good and valid sureties are often found wanting and such persons have been condemned to jail wherein they lose even the tender mercies of nature and come rather prepared to follow the ill ways of life. Sometimes poor people innocently suffer imprisonment because good men shrink to stand surety for one who goes condemned by the very order to find surety for good behaviour or to keep peace. To mitigate this hardship it is proposed to keep such a person under police superveillance. This measure is of couse within the discretion of the magistrate and will, we hope, be a salutary check in some important direction.

The other amendment refers to first offenders. It runs as follows:—

(1) In any case in which a person is convicted of theft, criminal misappropriation, cheating, or any other offence punishable with not more than two years' imprisonment before any Court, and no previous conviction is proved against him, if it appears to the Court before whom he is so convicted that, regard being had to the youth, character and antecedents of the offender, to the trivial nature of the offence, and to any extenuating circumstances under which the offence was committed, it is expedient that the offender be released on probation of good conduct, the Court may, instead of sentencing him at once to any punishment, direct that he be released on his entering into a bond with or without sureties, and during such period as the Court may direct, to appear and in the meantime to keep the peace and be of good behaviour.

(2) The Court may, if it thinks fit, direct that the offender shall pay the costs of the prosecution or some portion of the same, within such period and by such instalments as may be directed by the Court.

Explanation—For the purposes of this section the term "Court" shall mean a High Court, Court of Session, District Magistrate or Magistrate of the first class specially empowered in this behalf by the Local Government."

Punishment is, in modern times, intended to act as a deterrent. The present change in law in regard to first offenders is mainly a triumph of this humane principle. When a person is accused for the first time in his life of an offence he moves heaven and earth to keep up a good name. But the offence is unfortunately for him a completed act. He cannot remedy the past unless and until he pines away his days in a prison. The influences of a prison-life are most obnoxious and perverting. There he loses all the finer touches of honor, self-respect and good name. Punishment fails in numerous cases of first offenders to act as a moral tonic. In prisons new lessons of a wicked world are imbibed and the law of association beats a wrong pulse in them. To avoid this unpleasant and ruinous result, it is intended to restore if possible, the lives of first offenders to the paths of virtue. This power of admitting a first offender to rigid conditions of good behaviour is a very large one and is therefore conferred on magistrates of the first class and upwards. Any extra misbehaviour, will further subject him to the old punishment hanging over him. Where there are extenuating circumstances, good and redeeming antecedents of life, future possibilities of improvement or where there is extreme mental anxiety of the trial and a trying disgrace of the conviction, a first offender will have still a second chance to reform his erring ways. In short, the new rule is well and good.

But we like to refer to certain omissions that will be necessary to bring an Indian Criminal procedure to the refined tests of civilization. We would loyally request the Government to expunge the special proceedings laid down in regard to the European and American offenders. This is a stigma on the system of administering India. If our suggestion does not hold water with the ruling classes we would earnestly pray in the eloquent strain of the Hindu of Madras that a Native of India should be allowed to have his trial by the jury of his own countrymen.

## वऱ्हाड

हवामान—ढग वारंवार येतात आणि त्यामुळें थंडीचें मान अगदींच उतरलें. मध्यंतरीं मनस्वी उकडत देखील होतें. कांहीं कांहीं ठिकाणीं गेल्या शुक्रवाराच्या सुमारास पाऊसही थोडासा पडला. पीकें नीट स्थितींत आहेत. रब्बीचें पेरे चालूं आहेत. सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक नाहीं.

सुटी— आज पासून दिवाळीच्या सणास प्रारंभ होत असल्यामुळें सालाबादच्या वहिवाटीप्रमाणें आमचे प्रिय वाचक एक आठवड्याची रजा मंजूर करितील अशी उमेद आहे. ता० १ नोवेंबरचा वऱ्हाडसमाचाराचा अंक निघणार नाहीं.

मि० आर. डी. हेअर साहेब दीड वर्षाची रजा उपभोगून विलायतेहून परत अकोल्यास गेल्या बुधवारीं आपल्या डिपुटी कमिशनरचे जागीं रुजूं झाले. साहेब बहादूर जरा कृश दिसतात पण त्यांची प्रकृती निकोप आहे. हे पुढील पंधरवाड्यांत इनस्पेक्टर जनरल क्या० वारन हेस्तिंगस यांचें कामाचा चार्ज घेऊन त्यांस तीन महिन्यांच्या रजेवर जाण्यास मोकळे करितील आणि असि० कमिशनर मि० प्रीडो हे पूर्ववत डिपुटी कमिशनरच राहतील असें कळतें.

क्याप्टन डब्ल्यू हेग असिस्टंट कमिशनर यास १८ महिन्यांची रजा देण्यांत आली.

सय्यद मोईनुद्दीन खान असि. कमिशनर आकोला यास एक महिना १० दिवसांची हक्काची रजा मिळाल्या मुळें ते हैदराबादेकडे गेले आहेत. या सुट्टींत ते गृहस्थाश्रमाची दीक्षा घेणार आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

मि. गाडविन आस्टिन, डिपुटी कमिशनर इलिचपूर हे दहा दिवसांच्या रजेवर जात असल्या मुळें लेफटेनंट मारिस असि. कमिशनर खामगांव हे इलिचपुरास जातील. आणि खामगांवास मुनशी अजिजुद्दीन साहेब असि. कमिशनर, आकोला यांची बदली होणार आहे असें कळतें.

रा. रा. माधव रामचद्र, नाझर, खामगांव कचेरी, यांनीं पेनशन घेतल्या मुळें त्यांच्या ५० रुपयांच्या जागीं रा. रा. तुकाराम वामन शिरस्तेदार, सिव्हील जज्ज यांस बढती दिली हें कळविण्यास आनंद वाटतो.

वाशीम जिल्ह्यांतील धानोरें येथील रखमाबाई पाटलीण इचा खून तिच्या जावेच्या उपदेशानें व क्षुद्र लोभाच्या दृष्टीनें केल्याबद्दल गंगाराम व दतु या दोघा आरोपींस फांशीची शिक्षा सांगण्यांत आली.

अंदुऱ्याच्या खुनाची चौकशी मि० इलियट सेशन जज्ज हे आजारी असल्यामुळें दिसेंबर महिन्यावर तहकूब राहिली.

मुंबई युनिव्हरसिटीनें म्याट्रीक्युलेशन परीक्षे साठीं उमरावतीं हें एक परीक्षेचें स्थळ प्लेग मुळें नियमित केलें आहे. पण उमरावतीस बसणाऱ्या उमेदवारांची भाषा मात्र उर्दू किंवा परशिअन नको.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | ९० रु० |
| दादरी | ११० रु० |
| गहूं ( कांठे ) | १३५ रु० |
| ,,( बनशी ) | १४५ रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६॥= रु० मण |
| तूप | ८। मण |
| मीठ | ३॥।- मण. |

| | |
|---|---|
| सोनें | २५ तोळा |
| चांदी | ७५ |

नोटीस

एमप्रेस मिल नागपूर कारखाना अकोला तर्फे एजंट जमनादास पोतदार यांस जानु वल्लद सोनाजी बंड माळी व तानु वल्द सोनाजी बंड माळी अज्ञान पालन करणार वडील बंधु जानु वल्द सोनाजी माळी रहाणार अकोला याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं आह्मी तुह्मास सर्वे नंबर ५ अकोला येथील या पैकीं कांहीं भाग कारखान्या करितां भाड्यांनीं दिला आहे. त्या बद्दल मी तुह्मास भाडेपटा लिहून दिली आहे. सदर्हू सालीम नंबर रामचंद्र जोखीराम रुंगटा साहू दुकान अकोला याज ला खरेदी देऊन त्याबद्दल खरेदीखत लिहून दिले आहे सबब सदर्हू शेतावर आमची बिलकूल मालकी राहिली नाहीं. पूर्ण मालक रामचंद्र शेट झाले आहेत. करितां चालू सालचे जमिनीचे भाडे आमचे करारा प्रमाणें व पुढें प्रत्येक सालचे भाडे रामचंद्र शेट यानला द्यावे. कोणतेही प्रकार हरकत करूं नये. कळावें तारीख २३ माहे आक्टोबर सन १८९७ इ.

( सही )

जानु वलद सोनाची माळी निशाणी खुद्द हातची. दस्तुर तानु वलद सोनाजी माळी.

तानु वल्लद सोनाजी माळी दस्तुर खुद्द.

नोटीस

रा. रा. इंद्रासिंग आईधान मालक सांगवीदास नंदलाल साहु दुकान अकोलें यांस नोटीस देणार जानु वा सोनाजी माळी व तानु वा सोनाजी माळी अज्ञान पालन करणार वडील जानु वा सोनाजी माळी रहाणार अकोला याजकडून देण्यांत येत आहे कीं, अकोला येथील सर्व्हे नंबर ५ पैकीं कांहीं भागाची जमीन तुह्मास भाडे पट्टा लिहून दिला आहे त्या प्रमाणें कारखान्या करितां दिली आहे. सदर्हू नंबरचें सालीम शेत रामचंद्र जोखीराम रुंगटा साहु दुकान अकोला यांस खरेदी देऊन त्याज बद्दल खरीदीखत लिहून दिलें आहे. सबब सदर्हू शेतावर माझी मालकी राहिली नाहीं. आतां खरेदीचे हक्कानीं रामचंद्र जोखीराम रुंगटा हे पूर्ण मालक जाले आहेत. करितां जमीन सदर्हू नंबर पैकीं भाड्यानीं दिली आहे त्याचें चालू सालचें भाडें रामचंद्र शेट यांजला मुजरा दिलें. पुढचे साला पासून प्रत्येक वर्षी आमचे करारा प्रमाणें जमिनीचें भाडें रामचंद्र याजला द्यावें. हरकत करूं नये. केल्यास त्याचें नुकसानीचे आह्मी जबाबदार रहाणार नाहीं हें आपणास कळावें तारीख २३ माहे अक्टोबर सन १८९७ इसवी.

( सही )

जानु वल्लद सोनाजी माळी निशानी खुद्द हातची

दस्तुर. तानु वल्लद सोनाजी माळी रहाणार अकोला.

## वर्तमानसार.

निजाम सरकारास दिवसेंदिवस पैशाची तूट पडत चालली आहे, असें नुकतेंच त्यांनीं जो आपला एक प्रांत एक कोट रुपयास गहाण दिला हा वरून पुष्कळांस वाटूं लागलें आहे. हिंदुस्थानांत जीं स्वतंत्र संस्थानें आहेत त्या सर्वांत निजामचें राज्य मोठें आहे, तेव्हां त्या राज्यावर अशा प्रकारें कर्जाचा बोजा वाढूं लागल्यास त्याचें राहिलेलें वैभवही कमी कमी होण्याची पुष्कळांस भीति वाटूं लागली होती, परंतु तरुण निझाम सरकारांनीं ह्या गोष्टीकडे वेळींच लक्ष पुरवून, राज्यांतील गुलखातें, तसेंच मेजवान्या, पेन्शन, सरकारची कोठी यांकडे जो खर्च होतो त्याचा तपासणी करण्याकरितां एक कमिशन नेमलें आहे. ह्या कमिशनांत नवाब सर अस्मानजहा के. सी. आय. इ.; महाराजा किसनप्रसाद पेशकर, व नवाब शहाबजंग पब्लिकवर्क्सकडील मुख्य प्रधान अशा तिघांची योजना केली आहे. वर लिहिलेल्या खात्यांत खर्चाची फार उधळपट्टी होते असा निझाम सरकारचा समज आहे. व त्यांत सुधारणा केल्यानें पुष्कळ फायदा होईल असा त्यांचा समज आहे, परंतु यांच्या मुख्य प्रधानास ही गोष्ट सम्मत नाहीं, आपणासंबंधीं निझाम सरकारच्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला असें त्यांस वाटून ह्या कमिशनासंबंधीं त्यांनीं स्वतःची नापसंती दर्शविली आहे. असल्या बाबतींत मुख्य प्रधानासारख्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांनीं नापसंती दाखविणें हें चुकीचें आहे तथापि निझामसरकारांनीं त्यांच्या पसंती नापसंतीकडे दुर्लक्ष करून या कामीं स्वतः लक्ष घातलें हें फार चांगलें केलें असें आह्मी ह्मणतो.

सरहद्दीच्या उत्तर भागांत ह्मणजे स्वात टोचीकडे शांतता झाली आहे. हाडामुल्ला पळून गेला व माहमांडी लोकांचा सर्वस्वी पराजय झाला. तेव्हां आतां तिकडची भीति फारशी राहिली नाहीं. परंतु दक्षिणेकडील मुख्य भाग जो टिरा तो तसाच राहिला आहे. त्यावर स्वारी करण्याची तयारी आज किती दिवसापासून ज्यारीनें चालू आहे. ह्या प्रदेशांतील बहुतेक लोक ओरकझी व आफ्रिदी या जातीचे आहेत. त्यांत आफ्रिदी लोक तर फार निग्रही व जबर लढाऊ आहेत. यांजजवळ दारूगोळाही पुष्कळ असून यांच्यांतील वेगवेगळ्या जातीचे मिळून साहजार लोक एकत्र जमले आहेत, तेव्हां यांच्याशीं सामना करताना इंग्रजी लष्कर पुष्कळ जेरीस येईल असें ह्मणतात. इंग्रजी लष्करांतील चार गोऱ्या पलटणींत आतांच ज्वर झाल्यामुळें त्यांस परत पाठविण्यांत आल्याची बातमी बाहेर आली आहे परत पाठविण्याचें कारण त्या तुकड्यांत आजारी लोक आहेत व त्यांस दोन दिवस मरमसांत भिजत उभें राहावें लागलें होतें असें सरकारी नात्यानें बाहेर आलें आहे. पिशोरचें सिव्हील मिलिटरी ग्याझेट ह्मणतें कीं, त्या सैन्यांत जंगली तापाचा शिरकाव झाल्यामुळें त्या लोकांस परत पाठवावें लागलें, ही खरी हकीकत कांहीं वेगळीच असल्याचें लोक बोलतात. तेव्हां ह्या स्वारीचा शेवट कसा होतो, तें पाहण्याकडे लोकांचें लक्ष लागलें आहे.

राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष.—मद्रासचे आन. मि. शंकर नायर बी. ए. एल. एल. बी यांस यंदाच्या राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें ह्मणून विनंती करण्यांत आली आहे व त्यांचीच या उच्च पदीं योजना होईल असा संभव दिसतो. नामदार नायर हे मद्रासच्या कायदेकौन्सिलचे मेंबर आज बरींच वर्षे असून मद्रास हायकोर्टाचे प्रमुख वकील आहेत. हे उत्तम वक्ते असून दिसण्यांतही भव्य आहेत. अशा योग्यतेचा पुरुष यंदाच्या राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षाचे जागेकरितां लाभल्यास त्याबद्दल खरोखरी आनंदच मानावा लागेल.

दोघा श्री. नातु बंधूंनीं काळ्या पाण्यावर पाठवून देण्याचा विचार असल्याची सुद्धां बातमी प्रसिद्ध झाली आहे. पैकीं. श्री. रा. तात्या साहेबांला रंगुनास असें बहुधा पाठवून दिलें जाईल. उभयतां बंधूंना बरेंच इतमामानेंही वागविलें जात आहे असें मुंबई वैभवकर्ते लिहितात.

यलोफीव्हर—हल्लीं अमेरिकेंत पीतज्वराची सांथ पसरत चालली असून, हिंदुस्थानांत प्लेगच्या सांथीनें जी बंदोबस्ताची गडबड उडाली आहे. इकडच्या पेक्षांही तिकडे सांथीच्या गांवचे मनुष्य मुळींच बाहेर पडूं न देण्याची सक्त व्यवस्था केली आहे. त्यामुळें तर लोकांचे फारच हाल होत असून, आमच्या इकडच्या जुलमापेक्षांही तो जुलूम त्या लोकांस फार वाटत आहे. स० वि०

प्लेग निवारणाचें शिक्षण— ग्रंथीज्वराची सांथ आली असतां त्यावेळीं रोग्यांचे व पथ्यालत्यांची वगैरे व्यवस्था कशी करिता ह्याची माहिती ठिकठिकाणच्या सरकारी नोकरांस करून दिली तर त्याचा चांगला उपयोग होईल. अशा उद्देशानें पुणें, मुंबई, सुरत व अमदावाद येथें प्लेगच्या व्यवस्थेचें शिक्षण देण्याकरितां निरनिराळ्या खात्यांतील किती व कोणकोणते सरकारी नौकर पाठवितां येण्यासारखे आहेत, अशी माहिती जरूरीनें विचारल्याचें समजतें.

मि० जॉन डिलन प्रमुख सर्व आयरिश नॅशनॅलिस्ट सभासदांनीं कॉमन्स सभेचे पुढारी रा. ऑ. मि० ए. जे. बाल्फर यांना एक विनंतिपत्र पाठवून आर्यलंडचे बटाट्यांचें पीक सर्वस्वी बुडालें ह्मणून त्या लोकांच्या रक्षणाकरितां तातडीनें जरूरीचे कायदे पास करण्यास्तव पार्लमेंटची सभा भरवावी असें फारच आग्रहानें सुचविलें आहे.

८७ आगगाड्या एके दिवशीं लाहोर स्टेशनांतून लष्कराच्या सुटल्याचें समजतें.

विलक्षण जाहिरात— ग्लासगो येथील एका वर्तमानपत्राची जाहिरात एका पहाडावर खोदली आहे. ती चार मैलांच्या अंतरावरून स्पष्ट वाचतां येते. या जाहिरातीच्या प्रत्येक अक्षराची लांबी ४० फूट व ओळीची लांबी ३२३ फूट आहे. एकंदर सर्वे अक्षर १४०४२ चौरस फूट जमिनींत आहेत.

अद्भुत कारागीर— अमेरिका येथील एका चित्रकारानें मक्याच्या एका दाण्यावर एका यांत्रिक कारखान्याचें चित्र काढले आहे. त्यांत कारखान्याचे जवळच एक घोडा व एक गाडी उभी आहे व शेतकऱ्यांची एक टोळी सडकेवरून चालली आहे आणि एक मजूर धान्यानें भरलेलें गाठोडें पाठीवर घेऊन शिडीवर चढून जात आहे याप्रमाणें देखावा दाखविला आहे हें सर्व चित्र एकाच दाण्यावर काढलेलें आहे. कारागिराची कुशलता खरी. ज्ञा.

प्रोफेसर स्टुअर्ट नांवाच्या एक वनस्पतीशास्त्रज्ञानी थोडे दिवसांपूर्वी वनस्पतीच्या गुणधर्मावर व्याख्यान देतें असतां मध्य अमेरिकेंतील एका विलक्षण वनस्पतीचीं त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें माहिती सांगितली. या वनस्पतीस बैलशिंगी असें ह्मणतात. ही वनस्पति एक प्रकारच्या मुंग्यांना नेहमीं आपल्या आंगावर बाळगते. ती त्यांत बारीक बारीक कीटकांच्या अंड्याप्रमाणें कांहीं पदार्थ खाण्यास घालते, इतकेंच नव्हे तर तिच्या देहावर ठिकठिकाणीं मधुर मधुर असा रस सांठविलेला असून तो त्या मुंग्यांस फार आवडता. याशिवाय त्या मुंग्यांना राहण्यासाठीं देठांची पोकळी तयार असते. या मुंग्या जर त्या वनस्पतीवरून कमी केल्यातर ती वनस्पती कांहीं केल्या नीटपणीं वाढत नाहीं, व त्या झाडाचें त्याचें इतर कीटकांपासून रक्षण या मुंग्या करितात.

मनुष्य कितीही सशक्त असला तरी तो एका दिवसांत पायीं चालून किती प्रवास करील हें सहज सांगतां येतें. परंतु सांऱ्या दिवसभर सगळ्या घरभर भिरिभिरी हिंडणारे मूल किती प्रवास करीत असेल याचा अदाज कधीं कोणी केला नाहीं; परंतु पिटर्सबर्ग येथील एका गृहस्थानें याही प्रकरणीं शोध करून पाहिला. त्यानें आपल्या सर्व दिवाणखान्याभर पांढरी चादर पसरून दिली. व तेथें आपल्या दीड वर्षाच्या मुलाच्या घोट्यास एक शाईचा बोळा बांधून त्यास सोडून दिले. त्या बोळ्याची रचना अशी केली होती कीं, त्या मुलानें एक पाऊल टाकतांच त्याची खूण खालच्या चादरीवर व्हावी. मुलास सकाळपासून रात्रपर्यंत खुशाल खेळूं दिलें व रात्रींच्या खुणा मोजल्या तो ६४८३ भरल्या. दर दोन पावलांच्या मध्यें सुमारें सहा इंच जागा प्रवासली जाते असें धरल्यास त्या मुलानें ३२४२ फूट अथवा जवळ जवळ पाऊण मैल प्रवास केला असें होतें. हें मूल साधारण मध्यम शक्तीचें व मध्यम हाडापेराचें च होतें. दीड वर्षाच्या मुलावर हा प्रयोग झाल्यानंतर त्या गृहस्थानें आपल्या नऊ वर्षांच्या मुलाचा दर दिवसांत किती प्रवास होतो तें पाहण्यासाठीं एक पदमापक यंत्र त्याच्या खिशांत घातलें. त्या यंत्राची रचना अशा तऱ्हेची होती कीं, त्या मुलास हें बापानें आपल्या खिशांत एक खेळणेंच घातलें आहे असें वाटावें आणि पहिले दोन दिवस तर त्यास आपल्या खिशांत कांहीं विशेष आहे असें वाटलेंही नाहीं. या यंत्राच्या योगानें मनुष्य चालला किती हें सहज समजतें. पहिले दिवशीं तो मुलगा ९ १/८ मैल हिंडल्याचें दिसून आलें, दुसरे दिवशीं १० ३/१७, तिसरा दिवस पावसाचा होता ते दिवशीं ७ १/२ आणि चवथे दिवशीं ९ ६/७ क.

मलूर नदींत बुडालेल्या बायकांच्या आंगावरील दागीने काढून घेऊन चोरांनीं आपली चांगली पोळी पिकविली आहे.

हरिद्वार येथें प्लेग सुरू झाला असें ह्मणतात.

७०० एकर जमीनीवरील टोळ १० दिवसांच्या आंत नाहींसे करण्याचें औषध नेटल येथें एकानें शोधून काढलें आहे.

सिंधप्रांतात टोळांनीं पिकांचा फार नाश केल्याचें कळतें.

सुरत जेलमध्यें कॉलरा व गांठ्या तापानें प्रवेश केल्यामुळें तेथें बरीच गडबड उडाली आहे. गु०

पंजाब सरकार आपल्या इलाख्याच्या न्यायखात्याच्या व्यवस्थेंत फेरफार करण्याचा विचार करीत आहे. जज्यांच्या मोठाल्या जागा कमी करून लहान पगाराच्या जास्त करीत आहे आणि मानि. ये काम वेळच्या वेळीं होण्याकरतां असि. कलेक्टरच्या जागा वाढवीत आहे. यांत खर्चाची रकम न वाढवितां प्रॉव्हिन्शियल नौकरांची भरती होणार आहे असें सांगतात.

आगबोट बुडाली—अमेरिकेंतून ग्लेनर नांवाची आगबोट पाऊण लाख राकेलपेटी घेऊन कलकत्त्यास येत असतां सागरबेटाजवळ फुटली. सुदैवानें वरील माणसें मात्र दुसरे आगबोटींत कलकत्त्यास सुरक्षित आणून पोंचविलीं.

हिंदुस्थानांतील टांकसाळी पुन्हा सुरू करण्याचा सरकारचा विचार असल्याबद्दल विलायती पत्रांतून ध्वनित होऊं लागलें आहे.

बेळगांव व शहापूरमधील व आसपासचे शेतांत अतिशय टोळ झाल्यामुळें तीं शेतें मात्र सपशेल बुडालीं आहेत. या टोळांचा बीमोड कसा होईल इकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिलें आहे. यंदां शेतें बुडालीं तीं बुडालीं, पण येत्या सालीं याच शेतांत हल्लींच्या शतपटीनें टोळ नवीन उद्भवतील अशी भीति वाटत आहे. कांहीं उपाय सुचत नाहीं. क०त०

पतिहत्या—बुधापेस्ट (हंगारी) येथें पतिहत्याची सांथ झाल्यासारखी दिसते आहे गेल्या महिन्यांत पतिहत्यांच्या कामांत सामील असलेल्या बायका पुरुषास खालीं लिहिल्याप्रमाणें शिक्षा झाल्या आहेत. एका बाईस चार पुरुषास, दुसरीस दोन पुरुषास, व तिसरीस एका पुरुषास विषप्रयोग केल्याबद्दल देहांत शिक्षा झाल्या. एका बाईस नवऱ्याचा अन्य रीतीनें खून केल्याबद्दल देहांत शिक्षा झाली.

फार मोठा जंत—एका निग्रो मनुष्याला जंत झाले आहेत असें डॉक्टरला वाटल्यावरून त्यास जंताचें औषध देण्यांत आलें. त्यामुळें त्यास वांती होऊन एक जंत पडला. त्याची लांबी १२८ फूट होती. त्या निग्रोला त्या वेळीं आपली आंतडीच बाहेर पडली असें वाटलें. तो जंत करंगळी एवढा मोठा होता, त्याचें डोकें सापाच्या डोक्या सारखें होतें, व तोंडांत करंगळी शिरेल एवढें ते मोठें होतें. तो जंत पांढुरका असून त्यास जागजागी सांधे होते अर्थात तो वादी सारखा जंत (विव्रनिम) होता. तो पडेपर्यंत रोग्यास फारच त्रास झाला.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.